# विद्या प्रसारक मंडळ, ठाणे

| | | |
|---|---|---|
| मासिकाचे नाव | : | दिशा |
| संपादक | : | श्री. अचलकुमार टिल्लू |
| प्रकाशक | : | विद्या प्रसारक मंडळ |
| प्रकाशन वर्ष | : | २००१ |
| वर्ष | : | पहिले |
| अंक | : | ५ |
| पृष्ठे | : | ४० पृष्ठे |

**गणपत्रिका विद्या प्रसारक मंडळाच्या "ग्रंथालय" प्रकल्पांतर्गत निर्मिती**

**गणपत्रिका निर्मिती वर्ष : २०१०**

**गणपत्रिका क्रमांक : ४५**


MAHMAR 19358/13/1/2000 - TC

विद्या प्रसारक मंडळ

व्ही. पी. एम्.

# दिशा

वर्ष पहिले / अंक ५ / एप्रिल २००१





# व्ही. पी. एम्. दिशा

वर्ष पहिले / अंक ५ / एप्रिल २००१

**संपादक**
श्री. अचलकुमार टिळू

**कार्यकारी संपादक**
प्रा. मोहन पाठक

**सहसंपादक**
सौ. मंजिरी दांडेकर

**सहाय्यक मंडळ**
सौ. भारती जोशी
सौ. विशाखा देशपांडे
कु. दीपाली भाटकर

**कायदेविषयक सल्लागार**
ॲड. सलिल बुटाला

**कार्यालय**
विद्या प्रसारक मंडळ
डॉ. बेडेकर विद्यामंदिर
नौपाडा, ठाणे - ४०० ६०२.
दूरध्वनी : ५४१ ६२ ७०

**मुद्रण स्थळ :**
परफेक्ट प्रिन्ट्स,
नूरीबाबा दर्गा रोड, ठाणे.
दूरध्वनी : ५३४ १२ ११

## अनुक्रमणिका

| | | | |
|---|---|---|---|
| १) | संपादकीय | | ३ |
| २) | भावे राष्ट्रीय व्याख्यान माला | विजया वाड | ४ |
| ३) | हिरो अन् बाहुल्या | विनोद कांबळी | १३ |
| ४) | नवनवल वृक्षोत्सवा | अरुण ठाकूर | १४ |
| ५) | संजीवनी बोकील यांच्याशी बातचीत | सुधीर इ. शेटे, कौस्तुभ कर्णिक | १७ |
| ६) | जंगलाचा नाश | शशिकांत कोठेकर | २० |
| ७) | शिक्षण क्षेत्रात माफिया ! | निकित अभ्यंकर | २२ |
| ८) | ग्रंथप्रसाराच्या माझ्या प्रयोगाची फलश्रुती | श्रीकृष्ण ल. टिळक | २५ |
| ९) | डाऊश लँड (जर्मनी) - लेखांक १ | अजित पाटील | २७ |
| १०) | योग प्रशिक्षण वर्ग | कुंदा कारभारी | ३० |
| ११) | नेचर क्लब अहवाल | | ३२ |
| १२) | वाचनालयातील वाचक आणि वाचन | निशा जाधव | ३३ |
| १३) | परिसर वार्ता | विशाखा देशपांडे | ३५ |
| १४) | शब्द कोडे | अजित अ. कुलकर्णी | ४० |

सुविचारांचे संकलन श्यामल पाटील यांनी केले आहे. - संपादक

या अंकात व्यक्त झालेली मते त्या लेखकांची वैयक्तिक मते असून त्या मतांशी विद्या प्रसारक मंडळ तसेच संपादक सहमत असतीलच असे नाही

मनुष्य हा आपल्या भाग्याचा शिल्पकार आहे.

# संपादकीय

## विनंती आणि आवाहन

पाहता पाहता शैक्षणिक वर्ष संपायला आले. मे महिन्याची मोठी सुटी पुढील महिन्यात येईल. काळाची गती पाहिली की अवाक होण्यापलीकडे आपण काय करणार?

या निमित्ताने 'दिशा' चे वर्ष तपासून पाहिले तर बरेच प्रयोग करीत, प्रत्येक माणसाकडून, प्रत्येक घटनेतून काही ना काही शिकत दिशाची वाटचाल चालू आहे. नव्या विचारांचे स्वागत, पण अंधानुकरण करायचे नाही असा विचार मनात निश्चित आहे. शिक्षकांसाठी घेतलेल्या निबंध स्पर्धेला असाच उत्तम प्रतिसाद मिळाला. मात्र एक खंत या वेळी व्यक्त करावीशी वाटते ती म्हणजे दिशाला मोठ्या प्रमाणात सक्रिय(आर्थिक वा लेखन) सहकार्यांची गरज असता-नाही ज्यांनी ही मदत करायची ते हात आखडता घेतात. 'दिशा' फार उत्तम आहे, साहित्याची निवड छान आहे, वैविध्यपूर्ण आहे वगैरे नोंदी संपादक मंडळाला कळवणारे वाचक दोन शब्द लिहून द्या म्हटलं तर आळस करतात.

वास्तविक विशिष्ट ध्येय धोरणे डोळ्यासमोर ठेवून एक चांगले, दर्जेदार वैचारिक व्यासपीठ शिक्षण संस्थेने उपलब्ध करून देणे ही तशी दुर्मिळच बाब आहे. एखादी शिक्षण संस्था आदर्श प्रयत्न करीत असेल तर सुसंस्कारित व साक्षर वाचक, नागरिक म्हणून आपली ही काही जबाबदारी असते. विशेषत: शिक्षण प्रक्रियेतील सर्व लहान मोठ्या घटकांनी अंतर्मुख होऊन करावयाचा हा विचार आहे.

एकूण: महागाईचा रेटा लक्षात घेता वार्षिक वर्गणी वीस (रु. २०/-फक्त) रुपयांनी वाढविणे अपरिहार्य ठरत आहे. वाचकांनी ही परिस्थिती समजावून घेऊन सहकार्य करावे ही अपेक्षा आहे. तसेच लेखन सहकार्य देऊन दिशा अधिक समृद्ध करण्यास हातभार लावावा.

अनाहुत सल्ले देणारे खूप असतात. तुम्हाला 'दिशा' लोकप्रिय करायचे असेल तर राशिभविष्य चालू करा, मुखपृष्ठावर स्त्री चे आकर्षक चित्र द्या, कथा कादंबऱ्या द्या..... वगैरे. पण 'दिशा' ही शिक्षण संस्थेची चळवळ आहे. अभिरुचिसंपन्न साहित्य देणे ही त्यातील पहिली बांधिलकी आहे. तेव्हा अनाहुत सल्ला देणाऱ्या मित्रांनी आपण त्या दृष्टीने कशी मदत करू शकू हे पहावे. दिशाला तुमची गरज आहेच पण त्यासाठी दिशा या शैक्षणिक उपक्रमाचे ध्येय बाजूला ठेवणे शक्य होणार नाही.

•••

# भावे राष्ट्रीय व्याख्यान माला १९९८

*विद्या प्रसारक मंडळाच्या अनेक उपक्रमांपैकी एक भावे राष्ट्रीय व्याख्यानमाला हा आहे. १९९८ साली श्रीमती विजया वाड यांचे या व्याख्यान मालेत 'स्त्री शक्ती 'या 'विषयावर भाषण झाले होते. संपादक मंडळातील एक सदस्य दीपाली भाटकर यांनी कॅसेट ऐकून हे भाषण लिहून काढले. 'दिशा' च्या वाचकांसाठी मुद्दाम देत आहोत. - संपादक*

दोन सुपुत्रांच्या स्मृतिप्रीत्यर्थ ही व्याख्यानमाला आहे. त्यांच्या स्मृतीलाही वंदन करते.

ठाणे हे माझे माहेरघर आहे. माझे बंधू इथे रहात होते आणि माझी आई गणपतीच्या देवळासमोरच्या भाव्यांच्या दुकानांतून साडी खरेदी करत असे. कारण नऊवारी लुगडी खरेदी करण्याचे ते एकमेव ठिकाण होते. त्यामुळे तुमच्याशी आमचा स्नेहबंध फार जुना आहे. तर आयोजित केलेली ही व्याख्यानमाला त्यामधे मला आपण आमंत्रित केलं, मला वाटतं मी पहिलीच बाई आहे, आधी सगळे पुरुष होते. पण स्त्री शक्तीचे हे विचार एकायला इथे पुरुषही आले आहेत. हे बघून माझं हृदय भरून आलं आहे.



गेल्या काही दिवसातल्या घटना बघितल्यावर माझं मन अतिशय अस्वस्थ होतं. पहाटेची वेळ आहे. जयबाला आशर नावाची एक मुलगी चर्नीरोड स्टेशनच्या आसपास आहे आणि एक गुंड मवाली लोफर असा मनुष्य ट्रेन मध्ये शिरतो आणि तिच्याकडे पैशाची मागणी करतो. मला सांगा, आपल्या कुणाकडेही, स्त्री काय पुरुष काय अशी मागणी केली असती तर, आपण काय लगेच त्याच्याकडे पैशाचं पाकिट दिलं असतं ? नसतं दिलं. तशीच व्यक्तीसुलभ झटापट, ( स्त्री सुलभ नव्हे , व्यक्ती सुलभ झटापट) ती मुलगी करते. त्याला पैसे देण्यास नकार देते. त्याचे बक्षिस काय तर फरफटत ओढत तिला दारापाशी नेतो आणि ढकलून देतो. जयबालाचे दोन पाय जातात. जन्माची पांगळी होते. वर्तमानपत्रात बातमी आली तरी त्या वेळेला साक्षी असलेल्या मुक्या दोन बायका काही पुढे येऊ शकत नाहीत. माझ्या मनात ततक्षणी विचार आला तिथे मी असते तर मी काय केल असतं ? माझ्या विद्यार्थिनींना मी विचारलं, तुम्ही तेथे असता तर काय केल असतं ? मुली झटकन म्हणाल्या, 'आम्ही उठलो असतो, टिचर !' हे सांगायला सोपं वाटतं. पण प्रत्यक्ष त्या ठिकाणी काय घडलं असेल किंवा काय घडलं असतं ? आपण तेथे असतो तर आपणही स्तब्ध प्रेक्षक बनलो असतो का? ही भावना मनाला जाळायला लागते. तस्लिमा नसरीन या बंडखोर लेखिकेने इस्लामच्या विरोधात इतकं लिहिलं की तिला वाळीत टाकलं गेलं. ४ वर्षे अज्ञात वासात असलेल्या तस्लिमाला डोळ्यातं अश्रू आणून आपला अज्ञातवास संपवून शेवटी संपूर्ण शरणागती पत्करावी लागली. त्या वेळेला ती पळपळ

रडत होती. का रडत होती ? समाजव्यवस्थे पुढे अपुरी पडली. शरणागती पत्करावी लागली.

मुलीचं आणि मुलाचं प्रेम प्रकरण केवळ आईला सांगितलं म्हणून तिला जिवंत जाळलं जातं. एखाद्या अमृता देशपांडेची रस्त्यामधे अब्रू घेतली जाते आणि तरीही समाज स्तब्ध रहातो. या घटना वेगवेगळ्या असल्या, एकमेकींचा संबंध नसला तरी त्याच सूत्र एकच आहे की पुरुष प्रधान संस्कृतीमधे स्त्रीशक्तीचं झालेल पद्धतशीर खच्चीकरण. या विरूद्ध आवाज उठवायला स्त्री संघटना आहेत, पुरुष संघटना सुद्धा आहेत. पण तरीही हे प्रकार थांबत नाहीत. म्हणूनच माझं मन अस्वस्थ आहे. आपलं मन अस्वस्थ आहे हे मी जाणते म्हणूनच तर आज आपण माझे विचार ऐकायला आलात. संयुक्त राष्ट्रांच्या विकास पत्रिकेमधे असे म्हटलेल आहे, विकासाला जर लिंगभाव परिमाण नसेल तर विकास अर्थहीन आहे.

ज्यांना नोबेल पुरस्कार मिळाला ते अर्थशास्त्रज्ञ अमर्त्य सेन हे सुद्धा आपल्या कल्याणकारी अर्थशास्त्राच्या संकल्पामधे स्त्री शक्ती हाच पाया मानतात. 'समाजातला हा दुर्बल घटक दारिद्र्य रेषेच्या खाली जो पर्यंत आहे, जो पर्यंत स्त्री सक्षम बनत नाही तो पर्यंत आपला समाज कधीही वर उठणार नाही' असं अमर्त्य सेन यांनी म्हटल आहे. स्त्री शक्ती ही आपल्या सामर्थ्याचा पाया आहे; हे सर्वांनी ओळखलं पाहिजे आणि ते ओळखण्याची वेळ वर्षानुवर्षे येतेच आहे, चळवळी काय कमी झाल्या ? पहिली चळवळ अनुकंपेतून उभी राहिली. बिचारी स्त्री. तिला जगू द्या. तिला समाधानाचा, सुखाचा श्वास घेऊ द्या म्हणून समाजसुधारक पुढे आले, ते पुरुष होते. अपवादात्मक स्त्रियाही त्यात होत्या. त्या नंतर जी चळवळ आली ती उदारमतवाद्यांची चळवळ होती. त्यांचा असा व्यापक दृष्टिकोन होता की जर स्त्री आणि पुरुष शक्तीने सारखे असतील, तिची कुवत तिची काम करण्याची क्षमता पुरुषा एवढीच सक्षम असेल तर त्या स्त्रीला आणि पुरुषाला बरोबरीचे अधिकार दिले पाहिजेत. उदारमतवाद्यांमध्ये पांढरपेशा समाजाचा जास्त भरणा होता. त्यानंतर आली परिवर्तनवादी चळवळ. यामध्ये लिंग भाव, विषय परिमाणाला महत्त्व दिलं गेलं आणि स्त्रीचं स्त्रीत्व मान्य करून तिच्या शारीरिक मर्यादा आणि कुवतीला मान्य करून तिला माणूसपणानं जगण्याचा अधिकार दिला पाहिजे ही आग्रहाची भूमिका परिवर्तन वाद्यांनी मांडली आणि आजतागायत त्या भूमिकेला धरून स्त्रीविषयक चळवळी झाल्या आहेत आणि होत राहतील. पण तरीही सबंध जगाकडे दृष्टिक्षेप टाकला तर आपल्याला असं दिसेल की स्त्रीशक्ती कमी पडत आहे. १९९६ च्या अहवालानुसार ९६० दशलक्ष निरक्षर आहेत. सबंध जगात या ९६० दशलक्ष निरक्षरांपैकी स्त्रिया किती ? तर २/३ व पुरुषांच प्रमाण १/३ ही निराशाजनक परिस्थिती असल्यावर स्त्रीशक्तीच उत्थान होणार कसं ? प्राथमिक शाळेमध्ये मुली आणि मुलं किती हे बघितलं तर मुलींचं प्रमाण १३% कमी. भारतातल्या निरक्षर स्त्रिया व पुरुषांची तुलना केली तर स्त्रियांचे प्रमाण ६०% अधिक असल्यावर स्त्रीशक्तीचं त्यात होणार कसं? तेव्हा तिला साक्षर करणं तिला सक्षम करण हे आजचं तुमचं माझं सर्वांचं प्रथम कर्तव्य आहे. जगामधल्या प्रगतीचा निर्देशांक बघायचा झाला तर पुरुष आणि स्त्रिया यांच प्रमाण किती आहे, तो दर शंभरी ठरविला जातो. त्याप्रमाणे १९९६ ची ही आकडेवारी बघितली तर आपल्याला असं दिसून येईल की इंग्लंड, अमेरिका आणि संपूर्ण युरोप यामध्ये दर १०० पुरुषांमागे १०५ स्त्रिया आहेत. भारतामधे १००:९३ अस प्रमाण आहे. जपान आणि व्हिएतनाममधे १००ला १०३ असं प्रमाण आहे. अरब राष्ट्रामधे १००ला ८१ आणि अमिरातीमधे १००:५२. का हो ५२ का, कारण स्त्रीही व्यक्ती जन्माला आली याची नोंद नाही. नोंद नाही म्हणजे जन्माला आली नाही. नरड्याला नख लावलं, संपलं! स्त्री म्हणून जगण्याचा

एवढंच काय जन्मण्याचाही तिचा अधिकार हिरावून घेतला गेल्यावर अप्रगत देशांमधे १००:५२ असं प्रमाण असणं स्वाभाविक आहे. अमिरातीतच कशाला आपल्याकडे राजस्थानमध्ये अशा प्रकारची परिस्थिती होती असा टीव्हीचा वृत्तांत आहे. त्यामुळे तिला जन्माला न घालणं किंवा जन्मतःच तिला मारून टाकणं आम्ही श्रेयस्कर समजतो. अशा प्रकारचा आश्चर्यकारक, धक्कादायक आणि दुःखकारक असा रिपोर्ट टीव्हीवर ज्या वेळेला आपण बघतो, तेव्हा आपण कुठल्या जगात वावरत आहेत असं वाटतं. आणि ०.०३% सौभाग्य लाभलेल्या स्त्रियांमधेच आम्ही जगतो आणि इतक्या स्त्रिया अशाप्रकारचं दुर्लक्षित जिणं जगत आहेत हे बघून मन खिन्न होतं, उदास होतं. अशा वेळेला स्त्रीशक्तीचा विचार आपण करतो आहोत. तेव्हा काही गोष्टींना मी हात घालणार आहे.

त्यातली पहिली गोष्ट आहे बलात्कार! कायद्याने विचारले जाणारे किळसवाणे प्रश्न, लक्षात घेता, सर्वांसमोर ती काय व्यक्त करणार ? आनंद का वाटतो बलात्कार झाल्यावर ? अशा प्रकारचे प्रश्न विचारल्यावर ती शरमेने मान खाली घालते. अगोदरच तनामनाने पोळलेली असते. त्यावेळेला तिला अशाप्रकारे प्रश्न विचारून तिच्या मनावर अत्याचार करणं, ती काही बोलली नाही म्हणजे तिला काही वाटलं नाही असं कागदावरती गृहीत धरणं ही केवढी अन्यायकारक घटना आहे, हे आपण लक्षात घ्या. आज मी खूप असामान्य स्त्रियांचा विचार करणार नाही. आज मी सामान्य स्त्रीच्या असामान्य दुःखांची भलावण करणार आहे. या दृष्टीने या स्त्रिया पूर्णपणे निरक्षर होत्या, अशा भवरीबाई आणि देवकाबाई यांना मला सलाम ठोकावासा वाटतो. देवकाबाईची दुर्दैवी कहाणी आपल्याला माहीत नसेल तर मी थोडक्यात सांगते. मातंग समाजातल्या भटक्या लोकांना आज इथं तर उद्या तिथं असं जीवन जगावं लागतं आणि पोलिसांच्या ससेमिऱ्यातून त्यांची कधीही सुटका होत नाही. देवकाबाईला नवऱ्यानं डोरलं गळ्यामधे आणलयं, कष्ट करून, पैसे देऊन. पोलीस घरामध्ये घुसतो आणि सांगतो ते डोरलं तू चोरून आणले आहेस, नवरा म्हणतो नाही. ही माझ्याकडे पावती आहे. नवरा त्या वळकटीत ठेवलेली पावती पोलिसाला देतो. पोलीस ती बघतो आणि चुरगळून फेकून देतो. एक पुरावा डोळ्या देखत नष्ट होतो. देवका रडत असते. नवरा पाय पकडतो पोलिसांचे. पोलीस त्याला बेदम मारतो, पलंगाला बांधून ठेवतो आणि नवऱ्यासमोर देवकावर बलात्कार होतो. ती न्यायासाठी दारदर भटकते, पण तिला न्याय मिळत नाही. अशा परिस्थितीत भाऊ तिला सांगतो, 'की उकळत्या तेलामधे पैसा टाकलेला आहे तो पैसा जर तू काढलास तर तू पवित्र नाही, तर तू अपवित्र'. ती सांगते, 'माझ्या भावांनो तुम्ही घाला की उकळत्या तेलामध्ये हात. तुम्ही सगळे पवित्र आहात ना?' सगळे चूप होतात. सीतेच अग्निदिव्य आमच्या स्त्रियांना पुन्हा पुन्हा किती वेळा कराव ' लागणार ?

पावित्र्याची संकल्पना तुम्ही बलात्काराशी जोडणार ? एखाद्यावरती जर बळजबरी झाली असेल, आपली पर्स कोणी हिसकावून घेतली तर आपलं पावित्र्य नष्ट होत नाही. परंतु बलात्कार झाला तर मात्र ती अपवित्र. कुठला हा न्याय ! ज्याने केला तो अपवित्र नाही, तिचं शरीर कमी पडलं म्हणून ती अपवित्र. १३ वर्षापूर्वी बांद्यात झालेली घटना आपल्याला आठवत असेल की. ९ ते १२ च्या सिनेमाला एक नवपरिणीत जोडपं गेलं. हे जोडपं माझ्या ओळखीचं होतं. ती सांगत होती ९-१२चा सिनेमा नको पण नवऱ्यानं आग्रहानं नेलं. स्कूटर आहे माझ्याकडे कोण काय करतंय !. सिनेमा बघून जोडपं आनंदानं परतत असताना दोरी लावून स्कूटर पाडून चार माणसं पुढे आली. दोघांनी नवऱ्याला पकडून ठेवलं. दोघांनी तिच्यावर बलात्कार केला. ती रडत रडत घरी आली. ती म्हणाली पोलिसांकडे तक्रार करा. नवरा म्हणाला जाऊ दे ही गोष्ट फक्त तुला आणि मलाच माहीत आहे. याची वाच्यता नको

कारण सगळे सुशिक्षित पांढरपेशे मला नजरेने फाडून खातील (ही काळजी!) तेव्हा ती म्हणाली मला हे चालणार नाही, मी त्यांना ओळखू शकते आणि या प्रकरणात तू मला साथ दिली नाहीस, देणार नाहीस हे आता मला कळून चुकलंय. तेव्हा तुझ्या बरोबर रहाण्यात तरी काय अर्थ आहे? एका २१ वर्षाच्या सामान्य मुलीने घेतलेला निर्णय हा खूप मोठा होता हा सुशिक्षित नवरा तिची साथ देत नाही, पण भवरीबाईचा अशिक्षित नवरा तिची साथ देतोय. संबंध समाजात तिला बदफैली म्हटलं, तिला मोह होता असं म्हणून आपली कातडी बचावण्याचा प्रयत्न केला, त्यावेळेला भवरीबाईची साथ तिच्या जोडीदारानं सोडली नाही. त्यामुळे त्याचं महात्म्य! बलात्कार या प्रकरणाकडे सामान्य माणसाने अतिशय वेगळ्या दृष्टीकोनातून बघितलं पाहिजे की, येथे स्त्री शक्तीचं खच्चीकरण होतं नाही तर तिच्या शरीरधर्मानं तिच्यावर ओढवलेला अनवस्था प्रसंग आहे. ही गोष्ट प्रत्येकान लक्षात ठेवली पाहिजे.

आणखी एक गोष्ट. ही बाई धुणभांडी करणारी शांताबाई. नवरा रोज पिऊन घरी येणारा तरीही त्याला इमाने इतबारे सांभाळलेला. एक दिवस सगळं काम संपवून संध्याकाळच्या वेळेला बाई घरी जाते. तर सगळी झोपडी उध्वस्त, सगळं सामान इतस्ततः पसरलेलं तिचा तो गरिबीचा संसार उघड्या डोळ्यानं उध्वस्त झालेला तिनं बघितला आणि नवरा लक्तरा सारखा पडलेला बघितला. तिन बोंब ठोकली, काय झालं? झोपडपट्टीतले इतर लोक जवळ आले त्यांनी सांगितल, काल पर्यंत काका काका म्हणून नाचणारी पोरगी होती, यानं दारुच्या नशेत तिला नासवली. काय वाटलं असेल तिला? तिनं त्याला उठवलं संबंध झोपडपट्टीत बोंब ठोकली, चला ग आया बायांनो याला पोलिस स्टेशनला घेऊन जाऊ. आहे कुठल्या पांढरपेशा स्त्रीचं एवढं धैर्य? तिनं नेलं. नवऱ्यास लॉकपमधे टाकलं ७ वर्ष कारावासाची शिक्षा झाली.पण शांताबाईच्या नोकऱ्या गेल्या. धडाधड. वकिलाकडे काम करणारी शांताबाई दुसऱ्या दिवशी गेली. त्या वकिलीणबाईन सांगितलं नको ग बाई आमचे मालक नाही म्हणतात. एका सोशल वर्करने तिला आधार दिला. तिला जगण्यासाठी सवड दिली, पैसा दिला आणि शांता पुन्हा उभी राहिली. मग ती खेदानं पांढरपेशा बायकांना लाडावलेल्या मांजऱ्या म्हणाली तरी मला तिचा राग येत नाही.



१९६१ साली हुंडाविरोधी कायदा अस्तित्वात आला पण तो कागदोपत्रीच राहिला. मग कलम ४९८ असो की ३०२ असो. स्त्रीला क्रौर्याची वागणूक देणारे लोक दंडनीय गुन्हा करतात किंवा तिला संशयास्पद मृत्यू झाला तर नवऱ्याला व जवळच्या नातेवाईकांना तुरुंगात टाकण्याची मुभा कायद्यानं दिलेली आहे. परंतु ती फक्त पेपरवरच राहिलेली आहे. किती मुलींचे आईवडील पुढे येतात हो? ते म्हणतात आमची मुलगी जीवानं गेली आता आम्हाला काय करायचं? हे तर सगळ्यात मोठे समाजकंटक आहेत. त्यांना बाहेर काढलं पाहिजे नाहीतर स्त्री शक्ती,

स्त्री सामर्थ्य लोकांना कळणार तरी कधी? मंजुश्री सारडा प्रकरण. शरद सारडाच्या घरावरती अनेक वेळेला हल्ले झाले होते. मोर्चे गेले होते. पण परिणाम काय हो ? पुरेशा पुराव्या अभावी शरद सारडा सही सलामत सुटला आणि त्याचं दुसरं लग्न ही झाल, काय ही परिस्थिती?

हुंडा विरोधी कायदा हा फक्त कागदावरच रहाणार असेल आपल्या घरात येणार नसेल, आपल्या मनात येणार नसेल तर ही दुष्ट प्रथा कधीही बंद होणार नाही. वर्गातल्या मुलींना विचारलं ? जोडीदार कसा हवा ? तेव्हा काहींनी तो व्यसनी नसावा, मारणारा नसावा असं सांगितलं. म्हणजे १५ वर्षाच्या मुलींची नवऱ्याबद्दल कल्पना काय तर नवरा मारतो, व्यसन करतो. हे चित्र भयानक आहे. काहींनी सांगितल की आम्ही अजून विचार केला नाही नवऱ्याबद्दल. हे शक्य आहे. फक्त एकच उत्तर असं होत की माझे हक्क डावलणार नाही आणि मला माणूस पणानं जगू देईल असा असावा. मला खूप आवडलं ते उत्तर आणि एकीची वही कोरीच होती. तिला विचारल तेव्हा ती म्हणाली लिहायलाच पाहिजे का? लिहिते, आणि तिने जे लिहिलं ते वाचून मला इतका धक्का बसला की तिला मी एकटीला थांबवून घेतलं. कारण तिनं लिहिलं होत मला नवरा कसा असावा याचं उत्तर देता येणार नाही कारण माझ्या बाबतीत हा प्रश्नच उद्भवत नाही. कारण माझं मुळी लग्नच होणार नाही. मी विचारलं का? तर तिनं सांगितलं, की माझी आई बाबा आणि दादा म्हणतात की तू कोळशा सारखी काळी आहेस. तुझं काय लग्न होणार? १५ वर्षाच्या मुलीवरती असे विचार बिंबवणं आणि तिला पूर्ण निराश करणं त्यांना शोभते का? मी तिला म्हटल अगं रंगाच्या पलीकडे जाणारे ही पुरुष असतात. ज्यांना गुणांची पारख असते. तुझंही लग्न होईल. तेव्हा ती म्हणाली हो, कदाचित पैसे देऊन आई माझं लग्न करून देईलही पण मग मला लोक छळतील. तेव्हा मी म्हटल देव न करो तुझ लग्न होऊन तुझ्यावर छळवणुकीचा प्रसंग येवो. असं न होवो पण जर अशी पाळी आली तर मला वचन दे तू हुंडाबळी होणार नाहीस. आपल्या पायावर उभ राहूनच लग्न करशील. लग्न झाल्यावर एक समर्थ स्त्री म्हणून जगशील. त्या मुलीच मी किती समाधान करु शकले मला माहीत नाही. पण नंतर ती मुलगी इंजिनिअर झाली अजून लग्न झालेलं नाही. पण ती एक सक्षम स्त्री नक्कीच आहे आणि आज जी आई तिला कोळशासारखी काळी म्हणून हिणवत होती त्या आईचा सांभाळ ती मुलगी करतेय.

स्त्री शक्तीचं पद्धतशीर खच्चीकरण जर कुठे होत असेल तर ते तिच्या लक्ष्मीच्या रुपात. पुरुषाचा पगार त्याच्या घरात जातो. आणि लग्न झालेल्या स्त्रीचा पगारही त्याच घरी जातो. लग्न झाल्या झाल्या, त्या पगारावर सासरचे लोक हक्क सांगू लागतात. त्यांना असं कधी वाटत नाही की यातला काही वाटा तिला माहेरी द्यावासा वाटला तर तो देण्याचा तिचा हक्क आहे, मुभा आहे. घर कामाला तर मोलच नाही. सकाळी उठल्यापासून रात्री झोपेपर्यंत तिच्या कामाच काय मोल आपण तिला देतो ? असं सांगितलं जातं की पगार तिच्या हातात दिला जातो, आणखी काय हवं ? पण तो खर्च करण्याचा अखेरचा निर्णय त्यांचा असतो, आणि तिचं पद्धतशीर खच्चीकरण अशा प्रकारे होत की घरासाठी वर्षानुवर्ष झिजून तिचा आत्मविश्वास चाळीशी पंचेचाळिशीला कमी झाला की तुला काय अक्कल आहे? तू जगात काय बघितलं आहेस असं बिनदिक्कतपणे गृहिणीला मुलंसुद्धा म्हणू लागतात. कारण मुळात तिच्या नवऱ्याने तिला आदराने वागवलेले नसते.

याहूनही वाईट परिस्थिती शेतमजूर स्त्रीची आहे. घरामधे मुली असल्या, एक ऑफिशिअल, दुसरी अन ऑफिशिअल बायको असली तरी सगळेच शेतामधे राबतात कारण इतर शेतमजुरांना ठेवले तर पैसे द्यावे लागतील. मग घरातल्या सगळ्या बायका राबताहेत, मोल मजुरी करताहेत.

माझ्या एका विद्यार्थिनीचा छोटासा विजय आपल्याला स्त्री शक्ती म्हणून मला सांगावासा वाटतो. खूप मोठा नाहीये पण माझ्यासाठी तो मोठा आहे. कारण आपला निर्णय ती स्वतंत्रपणे घेऊ शकली. तिचं लग्न झालं या गोष्टीला आता १० वर्षं झाली. रु. ४५०० बँकेचा पगार. लग्न ठरतेवेळी मुलाला पगार किती मुलीला पगार किती हे सगळे माहीत असतं. लग्नानंतर पहिला पगार झाला. मला भेटली तेव्हा तिनं सांगितल मुलुंडला उतरावंसच नाही वाटत. सरळ ठाण्याला आले आईकडे. आजपर्यंत सगळा पगार मी आईला देत होते. तिला दुसर कोणीही नाही. तेव्हा मी आईला म्हटलं, 'आई हे ५००रु तू ठेव.' ५०० रु. ही काही जास्त रक्कम नव्हती. पण आई म्हणाली नको ग बाई त्याच्यावर आता माझा काय हक्क? आईला असं का वाटावा तिचीच तर मुलगी ती. तिच्यात काय फरक पडला. ती म्हणाली काही होत नाही आणि बळजबरीने ते पैसे देऊन ती सासरी गेली. सासूबाईच्या हाती तिने पगार दिला. सासूने लगेच तो मोजला पण त्या बोलल्या नाहीत. मुलाची वाट बघत राहिल्या. मुलगा आला, मुलानेही पगार झालेला आईकडे दिला. त्यांनी लगेच मोजला व म्हणाल्या पूर्ण आहे पगार. तो म्हणाला म्हणजे नेहमीच तर पूर्ण देतो की तुला. सासू: नाही, हिने ५००रु. कमी दिले होते. तिच्या छातीत धडधडत होते. एकच महिना झालेला लग्नाला माहीत नाही हे लोक कसे रिॲक्ट होतील.

ती : हो, ५००रु. कमी आहेत.

सासू: ठेवलेस का तू जवळ?

ती : नाही, आईला दिले.

सासू: आईला दिले? मधू बघ रे आईला दिले.

मधू : देऊ दे.

सासूला ते आवडले नाही. मग प्रथा पडते ना तशी! पण दाखवणार कसं मुलगाच म्हणतोय ना, देऊदे. मग लगेच म्हणाली मग तू आता सेकंड क्लासने जा म्हणजे तेवढंच भरून निघेल. ती म्हणे मला संताप आला मी लगेच म्हणाले, 'आई मधू जातो का सेकंड क्लासने ? मधू म्हणाल, 'जाऊ देना तिला फर्स्ट क्लासने. आता सासूला उघडपणे प्रतिकार करता येत नव्हता. पण Cold War सुरु झालं. तेव्हापासून आईचं मानधन सुरु आहे आणि हा तिच्यासाठी खूप मोठा विजय होता.

माझ्यासारख्या आज नोकरी करणाऱ्या इथे कितीतरी आहेत. त्यांना माहीत आहे की माहेरी पैसे देणं किती कठीण आहे. आणि सुरुवाती, सुरुवातीला तर ते फारच कठीण असते. लग्नाला १०-२० वर्षं झाल्यावर नवरे काही बोलत नाहीत. पण पहिल्या वेळेपासूनच असा स्वतंत्र निर्णय घेणारी माझी विद्यार्थिनी ही स्त्री शक्तीचं मूर्त प्रतीक आहे. असं मला वाटतं.

स्त्री शक्ती प्रदर्शनाची काही उदाहरणे मी आपल्याला आता सांगणार आहे.

१९७० सालची गोष्ट एका आदिवासी महिलेवर बलात्कार करणाऱ्या जमिनदाराला पकडून आणून नंदुरबार तालुक्यातल्या महिलांनी गाढवावरून धिंड काढली. त्या वेळेला जमिनदारांची अशी पद्धत होती की नवविवाहित स्त्री गावात असेल तर तिचा पहिला उपभोग त्याने घ्यायचा आणि नंतर मग ती नवऱ्याची. या विरुद्ध अनेक वेळा तक्रार करू सुद्धा पोलिसांनी दुर्लक्ष केलेलं. तेव्हा त्या जमिनदाराला बाहेर काढून बदड बदड बदडून सगळ्या महिलांनी धडा शिकवला. स्त्री शक्तीचा संघटित आविष्कार काय करू शकतो याचे हे उदाहरण.

जी हुंडाबळी झालेली स्त्री आहे तिची मृत्युपूर्व जबानी घेण्याचा जो प्रघात पडला तो सुद्धा स्त्री शक्तीमुळेचे. कारण अशा प्रकारची मृत्युपूर्व जबानी अत्यंत महत्त्वाची असून त्यामुळे नवऱ्याला, नवऱ्याच्या नातेवाईकांना अटक होऊ शकते.

---

युद्धाचा जन्म माणसाच्या मनात होतो आणि संरक्षणाची तयारी सुद्धा माणसाच्या मनात होते.

लोक न्यायालयाचा जो प्रकार आहे तो आपल्याला माहीतच आहे. तर अशी बनावट लोकन्यायालये बनवायची, त्याच्यात बनावट केसेस चालवायच्या व त्यामध्ये महिलांवर होणाऱ्या अत्याचाराच्या कहाण्या त्या केसेस मधून समाजापुढे आणायच्या आणि त्याला कशा प्रकारच शासन होऊ शकतं हे त्या नाटकातून लोकापर्यंत पोहोचवायचं. याचा पुष्कळसा प्रभाव आणि दबाव समाजावर निश्चितपणे पडलेला आहे.

१९८८ साली ८ महिला संघटनांनी, बलात्कार पत्नीहत्या, भ्रूणहत्या अशा अन्यायकारक प्रसंगाचे 'चित्र प्रदर्शन' भरवले आणि ते २० लक्ष लोकांनी बघितले. त्याचा परिणाम कुठेतरी त्यांच्या अंतःकरणावर नक्कीच झाला असेल. गांधी जयंतीच्या निमित्तानं १९९२ साली मद्यपान विरोधी चळवळ गडचिरोली भागामध्ये १० हजार लोकांनी केली होती आणि त्यावेळी ज्या लोकांनी दारु पिऊन बायकोला त्रास दिला होता अशांना त्या बायकांनी झोडलं होतं. त्यांना साडी नेसवून गावभर फिरवल होतं. हा एक छळाचा प्रकार असला तरी पुरुषांनी आधी केलेल्या छळाचा तो धुमसता आविष्कार असेल याची आपण कल्पना करु शकता. लाटणी मोर्चा. हा तर आपल्या सगळ्यांना ज्ञात आहे. प्रमिला दंडवते यांची मुलाखत नुकतीच मी घेतली तेव्हा त्यांनी सांगितलं की अशा प्रकारे लाटणे मोर्चे आम्ही काढतोच पण इंदिरा गांधीना देखील आम्ही सळो की पळो करून सोडल होतं. मुंबईमध्ये एकदा इंदिरांजींचं भाषण होत तेथेही आम्ही गेलो आणि इंदिरा गांधींनी तोंड उघडल्याबरोबर 'भाषण नही राशन चाहिए' म्हणून आम्ही जो काही गोंधळ उडवून दिला. त्यामुळे बाईंना माईक सोडून निघून जाव लागलं. त्यानंतर दिल्लीला शिवराज्याभिषेकाला ३५० वर्षे झाली. त्याबद्दल एक मोठा समारोह होता. त्या वेळी देखील प्रमिला ताईंनी इंदिराजींचे भाषण सुरु झाल्या बरोबर ' भाषण नही राशन चाहिए' सुरू केलं. ते ही भाषण इंदिराजींना सोडून द्यावे लागले. त्या नंतर बिर्ला मातोश्री सभागृहाच्या एका बिल्डिंगचे उद्घाटन होतं त्यावेळी इंदिरा गांधींना आतल्या दरवाजांनी आणण्यात आलं आणि तेव्हां इंदिराजींनी पहिला प्रश्न विचारला Is Mrs. Pramila Dandwate there ? एका स्त्रीला दुसऱ्या स्त्रीची अशी दशहत बसणं हे स्त्री चळवळीचं एक अनोख प्रदर्शन होत.

१९८६ साली एका औषध कंपनी मधे एक वेगळाच छळ करण्यात आला. स्त्रियांकडून प्रॉडक्शन कमी होतं, कामाच्या वेळेला बायका पुष्कळ वेळा Tiolet Occupy करतात. असं म्हणून फक्त ब्रेक मध्येच प्रसाधनगृह उघडल जाईल असा आदेश काढला गेला. हा तर छळच झाला. आता ८ पासून कामावर आलेली बाई कुठे बिराहून आलेली असेल तिला प्रसाधनगृह उघडं नको ? यावर बायकांनी एक अभिनव उपक्रम शोधला. तो म्हणजे एक प्रसाधनगृह लंच ब्रेकमध्ये एका बाईने Occupy केल की ती लंच संपेपर्यंत तिथेच राहिली. बाहेर रांग लागायला लागली. शेवटी कंपनीला शरणागती पत्करावी लागली. स्त्री शक्ती जर अशा ठिकाणी खर्ची होऊ लागली तर तिचा राष्ट्राच्या सामर्थ्यासाठी काय उपयोग करून घेणार ?

स्त्री शक्ती जागृत करण्यासाठी ५०% जनतेला दाबून दडपून कुठल्याही राष्ट्राचा विकास होत नाही. हे आपण लक्षात घेतलं पाहिजे. स्त्रीची निर्णय शक्ती वाढवण्याकडे पालकांनी लहानपणापासून अतिशय लक्ष दिलं पाहिजे. मला शांताबाई किर्लोस्करांबद्दल सांगावस वाटतं. १० व ९ वर्षांच्या आपल्या मुलींना त्या काळी बाजारात पाठवलं व सांगितलं फ्रॉकचं कापड घे. पायातले जोडे घे. शेजारा-पाजाऱ्यांना मोठं आश्चर्य वाटलं. त्यांनी सांगितल, अहो, कापड फाटेल,कापड आटेल, विटेल! त्या म्हणाल्या, आटू दे, फाटू दे, विटू दे ! अहो जोडा बरोबर येणार नाही. अहो लागेल ! लागू दे ! मुलींना फसवतील ! फसवू देत.

लोकांना वाटलं शांताबाईंच्या डोक्यावर परिणाम झाला. मग शांताबाई एकच म्हणाल्या अहो ९-१० वर्षांच्या

नेम चुकल्यावर फार निराश होऊ नका, नंतरचा लागेल, त्या नंतरचा लागेल, हेच जीवन आहे.

माझ्या मुली आरखून पारखून आज जोडा घेतील.आज चुकल्या तर उद्या बरोबर घेतील. परवा निश्चित बरोबर घेतील. ज्या मुलीला स्वत:चा जोडा निवडता येत नाही ती जोडीदार काय हो निवडणार ?

मुलींची निर्णय शक्ती खंबीरपणे वाढवणाऱ्या शांताबाई या माझ्या आदर्श आहेत. माझ्या बाबतीत ही त्यांचा आदर्श उपयोगी पडलेला आहे. अगदी घरातलं. उदाहरण आहे. माझी मुलगी सर्जन आहे. नवऱ्या बरोबर अमेरिकेला गेली. आई झाली. प्रत्येक वेळेला घरी आली की उदास दिसे. नवरा म्हणे, काय झालं तर ती म्हणाली की, ''वर्णभेदाने मी त्रासलेले आहे. मी ऑपरेशन केलेले चालत नाही.Asian Surgeons are not wanted for operation! मी फक्त पोट उघडायचं. अमेरिकन सर्जनस्नी ऑपरेशन करायचं आणि त्यांनी सांगितलं do the rest की मी पोट शिवायचं. नाही. मला नाही रे सहन होत!''.

रक्त उसळण्यासारखी गोष्ट आहे. तुमच्या जवळ शल्यकौशल्य असूनही तुम्ही करायचं नाही. का तर त्यांचा मान. ती परत आली. टाटा हॉस्पिटलमधे गेली ६ एप्रिल १९९८. डीन समोर उभी राहून म्हणाली मी आत्ताच आले पहाटे. मला करमत नाही. मला ऑपरेशन करायचंय. त्यांनी तिला लगेच सांगितले हातपाय धू, गाऊन घाल, आणि कामाला लाग. आमच्या लोकांची आम्हाला किंमत आहे, आणि सांगायला आनंद होतो की, तिच्या जोडीदाराला तिच्या सुखदुःखाची किंमत आहे. ती दुःखाने तिथे राहील तर ते त्याला नको आहे. तर हा स्वागतार्ह बदल आणि स्त्री शक्तीला मिळणारी थोडी थोडी उत्थापना आहे, असं मला वाटतं.

स्वत:च्या पायावर उभी राहणारी मुलगी तुमची माझी सर्वांची असली पाहिजे. हुंड्या खेरीज साधं लग्न हा पायंडा पडला पाहिजे. तिच्या वरती लग्न झाल्यावरही लक्ष असलं पाहिजे. कारण तिचा जर कोणत्याही कारणासाठी छळ होत असेल तर तो तिनं मुकाट सोसता कामा नये. आम्ही तुझ्या पाठीशी आहोत असं जेव्हा पालक मुलीला सांगतील त्यावेळेला ती आत्मविश्वासाने आपल्या होणाऱ्या सूक्ष्म छळाची कल्पना आपल्या आईवडिलांना देईल. ती जर चुकत असेल तर तिला मार्गदर्शन करा. पण जर ती चुकत नसेल आणि तिचा छळ होत असेल तर तिला जवळ करा आणि माहेरचा दरवाजा तुझ्यासाठी नेहमी उघडा आहे, असा विश्वास जरी तिला दिला तर तिचे खच्चीकरण होणार नाही. तिला सामाजिक भान असू द्या, मी माझी मुलं, माझी पत्नी, आमचं सुंदर घर, आमचा सोफा, आमचा टी.व्ही. असंच जर जगण्याचं लक्षण झालं तर स्त्री शक्तीचा अपव्ययच होणार. स्त्री शक्तीच कशाला, पुरुष शक्तीचा ही.

या बाबतीत एक उदाहरण देते. खूप वर्षं झाली त्या गोष्टीला. माझं अगदी नवं लग्न झालेलं होतं. श्रद्धानंद महिलाश्रमात गृहपाठ घ्यायला जायचे. तेव्हा एक छोटीशी मुलगी माझ्याकडे आली आणि म्हणाली,' बाई, अनाथ मुलींना नाव आणि आडनाव नसतं पण मला दोन्ही आहेत. माझ्या आईचा पत्ता सांगाना. मला खूप बघावसं वाटतं.' मला खूप वाईट वाटलं. पण संचालिका बाई म्हणाल्या,'सांगायलाच पाहिजे तिला स्वच्छ सत्य. तेव्हा मी तिला सांगितल, तू चांदण्यासारखी गोरी आहेस ना म्हणून बाई नी तुझं नाव शुभांगी ठेवलं आणि तू ठाण्याला सापडलीस म्हणून तुझं आडनाव ठाणेकर ठेवलं. तिला माझा खूप राग आला. त्या नंतर तिनं माझ्याशी अबोला धरला. मीच तिच्यापाशी जात असे. त्यानंतर एका निबंध स्पर्धेमध्ये पहिल्या नंबराचं बक्षिस मिळालं तेव्हा अभिनंदनाच्या कार्यक्रमात ती माझ्याकडे बघून हसली. त्या हसण्याचा पदर धरून मी तिच्या खोलीत गेले. आणि म्हटलं मलाही एक बक्षिस द्यायचयं काय देऊ सांग ? तेव्हा ती म्हणाली,' मी मागेन ते तुम्ही देणार नाही. अशी कोणती गोष्ट असेल १०-११ वर्षाच्या मुलगी माझ्याकडे मागते आणि मी देऊ शकत नाही. '' मला एक दिवस तुमच्या घरी न्याल?'' म्हटलं,

'' नक्की नेईन का नाही नेणार ?''

मी सासूबाईनाही सांगितलं, ती मुलगी आपल्याकडे येणार आहे. त्याही म्हणाल्या येऊ दे हो! खीरपुरीचा बेत केला. ती आली आणि म्हणाली बाई मी आजचा दिवस तुम्हाला आई म्हणू ? मला गंमत वाटली. मी २१ वर्षाची होते आणि रेडीमेड आई झाले, म्हणून ! मग ती दिवसभर खेळली सासऱ्यांनी तिला फ्रॉक घेतला होता मग आजोबांनी विचारलं काय ग तू कुठला निबंध लिहिलास! तर म्हणाली, 'माझी आजी' हा निबंध लिहिला आणि लिहिलं आश्रमातल्या बाई कशा दिसतात, बोलतात, वागतात. मग मला वाटायला लागलं हे काही खरं नाही ! खोटं खोटं आहे म्हणून मग मी शेवट असा केला की मी हे सगळं लिहिलय ना ते काल्पनिक आहे. मला घरच नाही मला आईच नाही तिथे आजी कशी असणार ? मग आजोबा म्हणाले अग तू असा शेवट केलास ना म्हणूनच तुला पहिला नंबर आला. असेच मग ६ वाजले मी तिला म्हटले चला. आता निघायला हवं. तेव्हा लगेच ती तयार झाली आणि म्हणाली बाई चला निघूया. किती त्या एवढ्याशा मुलीला कळत होतं.

त्या नंतर माझे पती सैन्यातून परत आले. त्यांनी इथे दवाखाना काढला. मी संसारी बनले. मला मुली झाल्या. मी आई झाले. आणि मग आपलं जातं आपण दळतोच तस माझंही जातं मी दळू लागले. नोकरी करायला लागले आणि शुभांगीचा विषय माझ्या मनातून विसर सीमेवर पडला. एकेदिवशी ठाण्याच्या तलावपाळीवर मुलींना बोटींग आवडायचं म्हणून गेले. तेथे तो बंदुकीने फुगे फोडणारा होता. तिथे माझ्या मुली फुगे फोडत होत्या. तर मागून हाक आली बाई ! बघितलं तर हसू, आवाज, डोळे मी ओळखले. तिच्या बरोबर दोन गुड्ड्या एवढ्या मुली होत्या. गळ्यात मंगळसूत्र नव्हतं. मी विचारलं. 'तुझ्या? 'हो माझ्या. चला समोरच्या हॉटेलमधे बसू.' आम्ही समोरच्या हॉटेलमधे बसलो.

आता तुमच्या सगळ्या प्रश्नांची उत्तर देते. माझं लग्न झालेलं नाही. टायपिंगचा व्यवसाय मी करते, घरातल्या घरात. पुष्कळ काम मिळतं. एक खोली घेतली आहे भाड्याने. आणि स्वतःच्या पायावर उभी राहिल्यावर पहिली गोष्ट कोणती केली असेल तर दोन्ही मुलींना दत्तक घेतलं.

बापरे ! माझ्या समोर एवढी छोटी मुलगी मला सांगत होती जीवनाचा सगळ्यात मोठा धडा ! तुम्हाला आठवतं बाई, पुष्कळ वर्षापूर्वी तुमच्याकडे आले होते. मला सारखं वाटत होत की तुम्हाला विचारावं मी इथेच राहू का ? पण मला धीर झाला नाही त्या वेळी. आणि कुठल्याचं अनाथ मुलीला तो होत नाही. असा याही मुलींना झाला नसता. आणि त्या तडफडत राहिल्या असत्या. बाई, सगळ्या जगाचं दुःख मी विकत घेऊ शकत नाही पण या दोन मुलींच दुःख तरी विकत घेतलं. त्यांना घर दिलं मी. '' तुला भीती नाही का ग वाटत ? तुझं लग्न कस होईल ?''

ती म्हणाली मुळीच नाही. माझ्या सारख्या विचार असलेला एखादा तरी दशलक्ष तरुणांमध्ये नसेल का बाई? निश्चित असेल. आणि नाही मिळाला तरी बेहत्तर .कारण मी आई आहे. हे स्त्री शक्तीचं केवढ मोठ रूप आहे. हे बघून माझं हृदय आनंदान भरुन आलं आणि मनोमनी मी तिला नमस्कार केला.

विजया वाड,
मुलुंड, मुंबई

▪ ▪ ▪


'तुम्हाला पगारवाढ कशाला पाहिजे हेच मुळी मला समजत नाही,' मॅनेजर वैतागून त्या शेळपट कारकुनावर ओरडला.

'साहेब!.... म... मला पगारवाढ नकोय. पण कसं कोण जाणे आमचे शेजारीपाजारी दिवसातून दोन वेळा जेवतात हे माझ्या मुलांना समजलंय'.

# हिरो अन् बाहुल्या

*साहित्यातील पात्रे निर्माण करणाऱ्या मूळ निर्मात्याला जग विसरते. त्याने निर्माण केलेली पात्रेच जगाला खरी वाटतात. - संपादक*

'Popularity is for dolls; hero cannot be popular' असं राल्फ इमर्सननं म्हटलं आहे. रोमँटिक वृत्तीला शह देण्यासाठी जॉर्ज बर्नार्ड शॉनं 'The Arms & The Man' ह्या अँटिरोमँटिक नाटकात हिरो-हिरॉइनला बाहुल्यांइतकं बनावट केलं आहे. सर्बिअस हा नाटकाचा हिरो वाटत नाही, तर भातुकलीतल्या खेळातला फाकडू शिलेदार शोभतो. रेना ही नाटकाची हिरॉइन वाटत नाही, तर मेणाची बाहुलीच भासते. पण शॉंचा मार्मिक घाव जगाच्या बोथट अकलेत घुसलाच नाही. शॉंच्या मिश्कील जोक्सवर जग खदखदून हसलं, पण त्या जगाला कळलं नाही की शॉ जगालाच मूर्खात काढू पाहतोय. जग अजब आहे. शहामृगाप्रमाणे ते कल्पनेच्या वाळूत डोकं खुपसून रहातं. हिरो-हिरॉइनचा हव्यास त्याला सुटत नाही आणि मग हे मातीचं जग मातीमोलाचे हिरो-हिरॉइन निर्माण करतं. जो नॉथन स्विफ्टनं 'Gulliver's Travel' लिहिलं. मिगेल सर्वांटिझनं 'Don Quixote' लिहिलं. पण त्या अभिजात कलाकृतींचा आत्मा जगाला दिसलाच नाही. Heroismला गाडण्यासाठी गलिव्हर अन् डॉन पुढे सरसावले. पण! काय दुर्दैव! ते पराभूत झालेत. कारण जगानं त्यांनाच हिरो बनविलं. सॅमसन हा जगाचा हिरो. त्याची सारी शक्ती त्याच्या केसात सामावलेली. तेच केस गमावल्यावर तो बाहुलीपेक्षाही जास्त नेभळा ठरला. जगाच्या हिरोला एकवेळ डोकं नसलं तरी चालेल पण ती लहरीगहरी झुल्पं हवीच हवी! जगाचे हिरो अन् हिरॉइन ह्या कठपुतळ्या आहेत. त्यांची मोहक हालचाल तेवढीच जगाला दिसते. पण त्यांच्या नाड्या आवळणारा हिरो जगाला कधीच दिसत नाही. कारण तो पडद्याआड असतो अन् पडद्याआडून सारी सूत्रं हलवू पाहतो. त्याला ठाऊक असते की पडद्याबाहेर येऊन काहीच



उपयोग नाही. ज्या जगानं खरा हिरो कधी पाहिलेलाच नाही त्या जगाला खरा हिरो डोळ्यापुढे असूनही ओळखता येणार नाही. जगाला स्टॅलिन समजेल पण ज्याच्या लिखाणातून स्टॅलिन निर्माण झाला तो मार्क्स जगाला कधीच कळणार नाही. जगाला अॅटमबॉंब कळेल पण ज्याच्या गणितातून अॅटमबॉंब निर्माण झाला तो आईनस्टाईन जगाला कधीच कळणार नाही. जगाला पाली अजंठाची शिल्पाकृती समजेल पण ज्याच्या किमयेनं फत्तरही साकार झाला तो कलाकार जगाला कधीच कळणार नाही.

हे जग भातुकलीच्या खेळात रस घेईल, पण खऱ्या जीवनाची रुची त्याला कधीच कळणार नाही. जगाला फक्त बाहुल्याच रिझवतील, पण खरा हिरो मात्र जगाकडून उपेक्षित रहाणार!

"Popularity is for dolls; hero cannot be popular."

**प्रा. विनोद कांबळी**
विद्या प्रसारक मंडळाची व्यवस्थापन अभ्यास संस्था, ठाणे.

***

# नवनवल वृक्षोत्सवा ||

*डोळे उघडे ठेवून निसर्गवाचन करणारे ठाण्यातील प्रसिद्ध व ज्येष्ठ गिर्यारोहक श्री. अरुण ठाकूर यांच्याकडील विविध विषय व अनुभवांपैकी एका वेगळ्या विषयावर त्यांनी दिलेली माहिती. - संपादक*


## जगातील विचित्र वृक्ष

निसर्गात अनेक वृक्षवल्ली अशा आहेत की त्या आपले अस्तित्व अत्यंत निराळ्या प्रकारे आश्चर्यकारकपणे दाखवून देतात. त्यांचा वेगळेपणा हे निसर्गाचेच देणे आहे. निसर्ग नियमानुसारच त्यांचं जंगलातील अस्तित्व टिकून असतं. तरीसुद्धा त्यांच आश्चर्यकारक जीवन हे वैशिष्ट्य ठरतं. त्यांचं हे वेगळेपण विचार करायला लावतं.

मध्य अमेरिकेत आणि विशेषत: पनामात अशा तऱ्हेचे वृक्ष आहेत की, त्यांची फळे मेणबत्तीसारखी असतात. ह्या फळांपासून एक प्रकारची चरबी मिळते. आणि तिचा जळणासाठी उपयोग होतो. अमेरिकेत १०० फूट घेर असलेला एक प्रचंड वृक्ष आहे. हा वृक्ष पोखरून आत माणसे रहातात. कित्येक वेळा या प्रकारच्या वृक्षाच्या पोटात ३०-४० माणसांना रहाता येईल इतकी मोठी जागा असते. या जातीच्या काही वृक्षात थोड्याशा जागाही बांधल्या जातात.

मेक्सिकोमध्ये सुईदोरा तयार करणारा एक वृक्ष आहे. या वृक्षाच्या प्रत्येक पानाला एक सुईसारखा काटा असतो. हा काटा खेचून काढला की, त्याच्यामागून आपोआपच पानातून दोरा बाहेर येतो. हा दोरा चांगला लांब असून शिवण्यासाठी योग्य असतो.

अमेरिकेच्या उष्ण कटिबंधात 'इक्विसेटम' नावाचा एक विचित्र वृक्ष आहे. हा साधारण ३० ते ४० फूट उंच वाढतो. त्याला एकही पान नसते.



## अमेरिकेतील प्रचंड वृक्ष

अमेरिकेतल्या व ऑस्ट्रेलियातल्या वृक्षांची उंची आणि जाडी याबाबतीत नेहमीच स्पर्धा चालू असते. सुमारे ५० वर्षांपूर्वी इथल्या एका वृक्षाची उंची ५२२ फूट असल्याचे सांगितले जात होते. मि. थॉमस बर्ड नावाच्या एका गृहस्थाने लिहून ठेवले आहे की, त्यांनी ५०० फूटापेक्षा जास्त उंची असलेला एकही वृक्ष पाहिलेला नाही. त्यांनी ४४० फूटापेक्षा जास्त उंची असलेल्या बऱ्याच विविध प्रकारच्या वृक्षांची उंची मोजून पाहिली होती. त्यांनी असेही लिहून ठेवले आहे की, सन १८९० पर्यंत ४०१ फूट उंचीचे असलेले व्हिक्टोरिया जंगलातील हजारो गोंदवृक्ष निष्कारण पाडून टाकण्यात आले. या वृक्षांच्या बुंध्याचा घेर ४० ते ५० फूटाच्या आसपास होता. त्यापैकी एका वृक्षाच्या मुळापासून ५ फूटावरचा घेर त्यांनी मोजला, तो ८८ फूट भरला. याच विषयात संशोधन करणारे दुसरे एक गृहस्थ मि. जे.डी. बिअर्स यांनी मोजलेल्या एका सर्वांत उंच वृक्षाची उंची ३२६ फूट १ इंच भरली होती.

कॅलिफोर्नियाचा प्रसिद्ध विशाल वृक्ष 'वेलिंग्टोनिया' याची प्रचंड वृक्षात गणना करण्यात येते. याची उंची ३०० फुटांपेक्षा जास्त असून त्याच्या शरीराचा घेर ८० ते १०० फूटांपर्यंत आहे. तेथल्या एका वृक्षाचा एक भाग असा आहे की, त्यात १३३५ वर्तुळे आहेत. परंतु त्या वृक्षावर असलेले प्रत्येक वर्तुळ एक वर्षाचे की अर्ध्या वर्षाचे द्योतक आहे, त्याबद्दल मतभेद आहेत.

'वेलिंग्टोनिया' वृक्ष कॅलिफोर्नियाच्या समुद्रसपाटीपासून ४५०० फूटांवर उगवतो. त्याच्या विशाल कायेचे कारण तेथील थंड हवा होय. कारण तो तेथे सुरक्षित रहातो. शिवाय ज्या जमिनीत तो उगवतो ती जमीन केवळ पावसाच्या पाण्याने भिजते असे नाही, तर तेथे सारख्या विरघळत असणाऱ्या बर्फाच्या पाण्यानेही ती सदोदित ओली असते.

जगातील सर्वात मोठा वृक्ष अमेरिकेत आहे. त्याचे आयुष्य ३०० वर्षांपेक्षा कमी नाही. ह्या वृक्षाची उंची केवळ एक फूट आहे. पण त्याच्या फांद्या ७० फूटापर्यंत पसरलेल्या आहेत. लांबून हा वृक्ष दाट वाटतो. परंतु जवळून पाहिल्यावर त्याचे खरे स्वरूप लक्षात येते. ह्या वृक्षाची फक्त उजव्या-डाव्या बाजूलाच वाढ होते. वरती वाढ होत नाही.

जपानमध्ये 'छोनो' नावाच्या ठिकाणी एक वृक्ष आहे. त्याला 'धुराचा वृक्ष' असे म्हणतात. सूर्यास्ताच्या वेळी जेव्हा सर्वत्र काळोख पसरतो त्यावेळी ह्या वृक्षाच्या शेंड्यामधून धूर निघतो. हा धूर का येतो हे अद्याप कोणालाही समजलेले नाही.

### मादागास्करमधील वृक्ष

दक्षिण आफ्रिकेतल्या मादागास्कर बेटात माणसे मारणारा एक वृक्ष आहे असे म्हणतात. हा वृक्ष माणसाचा प्राण कसा घेतो हे जर्मनीमधील डॉ. कार्ल लॅशन यांनी स्वत: पाहिले आहे.

ज्या भागात हा वृक्ष आहे, त्या मादागास्कर बेटाच्या भागात हबशी जमातीचे लोक रहातात. ते लोक या वृक्षाला आपला देव मानतात. कधी कधी एखाद्या स्त्रीचा त्याला बळीही देतात. ज्या दुर्दैवी स्त्रीला ह्या वृक्षाला बळी देण्याकरता निवडण्यात येते तिला त्या वृक्षाच्या शेंड्यावर चढविण्यात येते. त्या वृक्षाच्या तिच्या आजूबाजूस असणाऱ्या बारीक बारीक फांद्या तिच्या शरीराला सापासारखा विळखा घालतात. त्या वृक्षाची पाने मोठी व मजबूत असतात. त्यांना सुईसारखी टोके असतात. जेव्हा त्या वृक्षाच्या शाखा त्या स्त्रीच्या शरीराला विळखा घालतात, तेव्हा ती पानेही तिच्या शरीराला टोचतात. थोड्या वेळातच खाली रक्ताच्या धारा वाहू लागतात. काही दिवसातच त्या स्त्रीचा हाडाचा सापळा त्या वृक्षावर लोंबकळत रहातो.

आफ्रिकेच्या जंगलात सकाळी एकत्र होणारा आणि रात्री चंद्रप्रकाशात विस्तार पावणारा व कापणारा एक वृक्ष आहे. त्याच्या फुलांचा रंग काहीसा काळा-पिवळा असतो. त्याच्या शाखा लाल आणि एखाद्या जड दगडासारख्या असतात. त्याच्या पृष्ठभागावर काळे आणि पांढरे डाग असतात. हे डाग कायमस्वरुपात रहात नाहीत. ते दर आठवड्याला बदलतात. या वृक्षाची साल काढली तर त्या वृक्षातून हिरव्या रंगाचा दाट चीक बाहेर पडतो.

या वृक्षावर बरेच प्रयोग करण्यात आले आहेत. त्या वृक्षाच्या मुळाचा तुकडा काढला तर त्याचा रंग एकदम बदलून जातो आणि तुकडा सुकविला तर त्यातून नाना तऱ्हेचे किडे बाहेर पडतात. या मुळाचा तुकडा वाळवून पीठ केले आणि त्यात त्याचा तो हिरवा दाट चीक मिळविला तर त्याचा रंग पांढरा होतो. हा शरीराला लावल्यास शरीराची आग होते आणि तो लावलेला तेवढा भाग सडून जातो.

### सापाला बंद करणारा वृक्ष

या वृक्षाच्या फुलांना एक निराळ्याच प्रकारचा वास

---

दुसऱ्यांचे अनुभव जाणून घेणे हाही एक अनुभवच आहे.

येतो. ही फुले हातात घेऊन चुरगळली तर त्यातून एक प्रकारचा चिकट द्रव पदार्थ बाहेर येतो. त्यामुळे दोन्ही हात चिकटले जातात. आणि त्या वृक्षाच्या मुळाच्या तुकड्यापासून जे किडे येतात ते हाताला लावल्याशिवाय हे चिकटलेले हात सुटत नाहीत.

ह्या वृक्षाचा एक फायदा म्हणजे हा जिथे असतो त्या जागेपासून तीन मैलापर्यंतच्या प्रदेशात साप फिरकत नाही.

एखाद्या माणसाला सर्पदंश झाला आणि तो जर या वृक्षाचा हिरवा चीक प्यायला तर सर्व विषाचा प्रभाव नष्ट होतो. या वृक्षाच्या पानाचा रस एखाद्या पक्षाच्या अंड्यावर लावला तर अंड्याचा पांढरा रंग साफ दिसेनासा होतो. अलिकडेच काही वर्षांपूर्वी हा वृक्ष नष्ट करण्यात आला.

**वटवृक्षाचे प्रचंडपण**

आपल्याकडे प्रचंड वृक्षांत वटवृक्षाचे नाव घेण्यात येते. वटवृक्ष साधारणपणे ७० ते १०० फूट उंच असतो. त्याच्या बुंध्याचा घेर ४० फुटापर्यंत असतो. या वृक्षांच्या शाखांपासून अनेक पारंब्या निघतात. आणि त्या मुळांप्रमाणे पृथ्वीच्या पोटात शिरतात. याप्रमाणे हा वटवृक्ष आजूबाजूची बरीच जागा व्यापीत असतो. कित्येक वृक्षांना ओक वृक्षाप्रमाणे ३५० पर्यंत मुख्य पारंब्या असतात. आणि त्याशिवाय ३००० पेक्षा लहान पारंब्या असतात. अशा या वटवृक्षाखाली सुमारे ७००० माणसे सहज बसू शकतात. आणि त्या खाली छोटा बाजारही भरू शकतो. असे प्रचंड वटवृक्ष कैरोत (इजिप्त) आहेत. आपल्या भारतामध्ये असाच एक प्रचंड वटवृक्ष कलकत्ता येथील बोटानिकल गार्डनमध्ये आहे. इतरही ठिकाणी थोड्या प्रमाणात लहानमोठे वृक्ष पहावयास मिळतात.

पृथ्वीवर असणारा सर्वात मोठा वृक्ष म्हणून 'मेरी पझा' उपवनातील 'बाबोना' नावाच्या वृक्षाचा उल्लेख केला जातो. हा वृक्ष २८० फूट उंच असून त्याचा व्यास २८ फूट आहे.

अशी नानारूपाची लहान मोठी वृक्षवल्ली आपल्याकडे आढळून येतात. भ्रमंतीची आवड असेल व ती नियमितपणे चालू असेल व सोबत वनस्पतिशास्त्राचा थोडा अभ्यास असेल तर आपल्यालाही हा असा शोध घेता येतो.

**अरुण ठाकूर**
अरूण दर्शन, कोपरी रस्ता, नौपाडा, ठाणे - २.

* * *

**वाचकांचा पत्रव्यवहार**

'दिशा' हे मासिक विद्या प्रसारक मंडळाच्या दैदीप्यमान यशाचे एक पुढचे पाऊलच म्हणावे लागेल. ज्याप्रमाणे ही संस्था विद्यादानाचे पवित्र कार्य अखंड करीत आहे. त्याचप्रमाणे हे मासिकही विचारांच्याधारांनी सामाजिक, शैक्षणिक, वैयक्तिक अशा विविध पैलूंवर प्रकाश पाडणारे वाटले. तसेच नकळत आपल्या कार्यातून समाजासाठी काहीतरी करण्याची जाणीव करून देते.

मला या गोष्टीचा नेहमीच अभिमान वाटतो की, ज्या शिक्षणसंस्थेतून गेली आठ वर्षे मी ज्ञान आत्मसात केले आणि अजूनही करते आहे. तसेच माझे व्यक्तिमत्त्व घडवण्यामागे जिचा मोलाचा वाटा आहे तिचे कौतुक आज केंद्रस्तरीय पातळीवर होत आहे.

नेहमीच नवनवीन योजना व प्रकल्प कार्यान्वित करणाऱ्या व विद्यार्थ्यांसाठी अनमोल मार्गदर्शक असणाऱ्या संस्थेच्या या व तत्सम कार्यासाठी मनापासून शुभेच्छा !

**कु. कांचन रा. मळेकर**
M.Com. D.F.M.

* * *

# संजीवनी बोकील यांच्याशी बातचीत

*जानेवारीत संक्रांतीच्या दिवशी ठाण्याच्या 'मनसुबा अकादमी' तर्फे संजीवनी बोकील यांच्या कवितावाचनाचा कार्यक्रम झाला. त्यावेळी आमच्या संस्थेच्या विद्यार्थ्यांनी घेतलेली ही विशेष मुलाखत. - संपादक*

लीलाताई जोशी यांच्या 'मनसुबा अकादमी'ने मकरसंक्रांती दिनी दहिवडी, गुळपोळी, बेसनरवालाडू आणि तिळगूळ तर दिलाच पण त्याबरोबर एक अविस्मरणीय काव्य मेजवानी सुद्धा दिली. आणि संक्रांत साजरी झाली.

ख्यातनाम कवयित्री सौ. संजीवनी बोकील यांनी 'हृदयी येता भरते रे' हा काव्यगायनाचा कार्यक्रम सादर केला. त्याप्रसंगी आम्ही 'दिशा'साठी त्यांची मुलाखत घेण्याचा मनसुबा व्यक्त करताच त्यांनी आमच्याशी मारलेल्या ह्या अनौपचारिक मनसोक्त गप्पा.



**संजीवनी बोकील यांचे मनसुबा तर्फे स्वागत करतांना श्रीमती लीलाताई जोशी**

**प्रश्न :-** काव्यरचनेची आवड आपल्यामध्ये केव्हा आणि कशी निर्माण झाली?

**उत्तर :-** काव्यरचनेची स्फूर्ती मला माझ्या वारसा हक्काद्वारे वगैरे मिळाली नाही. मी पुण्यात हुजूरपागेत शिकले. माझ्या शाळेत लेखन विषयक अनेक उपक्रम चालत. त्यात मी प्रामुख्याने गद्यलेखन करीत असे. शाळेच्या 'बालिकादर्शन' अंकात मी माझी पहिली कथा लिहिली. माझा कल गद्य लेखनाकडे असताना इ. ८ वी मध्ये माझ्या मैत्रिणीच्या भावाचे अपघाती निधन झाले. त्याने मी फार दुःखी झाले. त्या दुःखाला मी काव्याद्वारे निचरा करून दिला. ओवी वृत्तात मी माझी पहिली कविता केली. आणि प्रारंभ झाला.

**प्रश्न :-** पहिल्यांदा छापून आलेली आपली पहिली कविता आणि तिची पार्श्वभूमी काय आहे?

**उत्तर :-** रिंकू पाटीलच्या क्रूर अंताने माझे मन व्यथित झाले. कवितेचे मूळ आत्म्याचा हुंकार असते. ह्या घटनेच्या अनुषंगाने विचार करता एकेकाळी श्रीकृष्णाच्या रुपाने स्त्रीला वस्त्र पुरवणारा पुरुष म्हणजे रक्षक ह्यांचा भक्षक झाला असताना त्याच्या अत्याचाराचा प्रतिकार करण्याचे सामर्थ्य स्त्रीत आहे, 'पण तू जागी होशील तर' असे समस्त स्त्री वर्गाला सांगणारी धीर देणारी कविता मी केली. ती केसरीमध्ये छापून आली.

**प्रश्न :-** काव्यगायन कार्यक्रमांतर्गत एखादा अविस्मरणीय कार्यक्रम सांगाल काय?

**उत्तर :-** पुण्यात कवी गिरीश यांचे नातू अरुण कानेटकर यांच्या घरी दस्तुर खुद्द (कै.) वसंत कानेटकर यांच्या

उपस्थितीत माझा २५ वा काव्यगायन कार्यक्रम झाला. बहुसंख्य श्रोते, वरिष्ठ साहित्यिकांनी दिलेली दाद त्यामुळे मी एवढी भारावून गेले की मला आता ते शद्बात सांगणे कठीण आहे. हा माझा अविस्मरणीय कार्यक्रम आहे. त्यानंतर माझ्या कार्यक्रमांची कमान उंचावत चालली आहे.

**प्रश्न :-** अशी एखादी कविता सांगा की, जी रचनेच्या वेळी मनाला भावली नाही पण 'हृदयी येता भरते रे' हा काव्यगायन कार्यक्रम करताना मनाला जास्त भावली.

**उत्तर :-** खरे तर कवितेची दाद मिळाल्यानंतरच ती मनाला जास्त भावते. आणि दाद मिळायला ती श्रोत्यांसमोर यावी लागते. कविता लिहित असताना तिच्यावरील प्रतिक्रिया कळत नाहीत. कवितावाचन कार्यक्रम सुरु झाले आणि 'आर्जव' ह्या माझ्या कवितेची परिणामकारकता मला जाणवू लागली. तेव्हापासून ती माझ्या मनाला अधिक भावू लागली. तिच्या रचनेच्या वेळी ती एवढी उंची गाठेल असे वाटले नव्हते. 'आर्जव' ही कविता महाराष्ट्र शासनाने 'पोस्टर' केली आहे.

**प्रश्न :-** आपल्या काव्यरचना शैलीवर अन्य कवी, कवयित्रींचा प्रभाव पडला आहे का?

**उत्तर :-** तसा प्रभाव वगैरे पडला नाही. कारण मी इतरांच्या कविता वाचल्यानंतर, ठरवून माझ्या कविता केल्या नाहीत. माझ्या स्वानुभवातून मला त्या स्फुरल्या आहेत. त्यामुळे माझ्या शैलीवर इतर कोणाचा प्रभाव पडला आहे असे मला वाटत नाही.

**प्रश्न :-** कवितेशिवाय आपण कोणते लेखन केले आहे?

**उत्तर :-** सुरुवातीलाच मी सांगितल्याप्रमाणे माझा कल गद्य लेखनाकडे होता. मी ११ वीत असताना 'पौर्णिमा' ही कादंबरी लिहिली. ती माझी पहिली कादंबरी. ती अर्धवट राहिली पण नंतर मी कादंबरी, बालकविता, लोकगीते, प्रेमचंदांच्या निवडक कथांचा अनुवाद, आदर्श हिंदी व्याकरण, सुबोध मराठी व्याकरण, शालेय व्याकरण इत्यादी प्रकारचे लेखन केले आहे.

**प्रश्न :-** लेखन-कवितागायन यांशिवाय अन्य छंद?

**उत्तर :-** माणसाला अभिव्यक्त व्हायला कोणते तरी एखादे माध्यम नेहमी हाताशी हवे असते. मी माझ्या लेखनातून मोकळी असते त्यावेळी मी वाचन करते.

**प्रश्न :-** तुमची स्वत:ची तुम्हाला सर्वात जास्त आवडलेली कविता कोणती?

**उत्तर :-** खरं तर निर्मिकाला आपल्या सर्वच कलाकृती मनापासून आवडत असतात. त्यामुळे स्वरचित कवितांपैकी कोणती एखादीच जास्त आवडते असे सांगणे कठीण आहे. परंतु माझी जी कविता जास्तीत जास्त श्रोत्यांना आवडते ती मला देखील आवडते आणि ती म्हणजे मघाशी उल्लेखिलेली 'आर्जव'.

**प्रश्न :-** कवयित्री आणि शिक्षिका या दुहेरी भूमिकेविषयी काय सांगाल?

**उत्तर :-** या दोन्ही भूमिका जगणं फार आवडतं. कारण त्या परस्पर पूरक आहेत. मी अध्यापन करताना माझ्यातील कवयित्रीची मला पुष्कळ मदत होऊन अध्यापन आनंददायी होते. विद्यार्थ्यांना अध्ययनात रूची निर्माण होईल असे काही देता येते. ते काव्यलेखन अंगामुळेच असे मला वाटते. आणि कविता करताना ज्या संस्कारक्षम मनांशी माझा शिक्षिका म्हणून संबंध येतो ते अनुभव उपयुक्त ठरतात.

**प्रश्न :-** तुम्हाला तुमची 'कला' टोपली खाली झाकून ठेवावी लागली नाही ह्याचे रहस्य काय?

**उत्तर :-** ह्याचे रहस्य म्हणजे माझा जोडीदार! माझे पती मला सदैव प्रोत्साहन देतात. माझ्या आनंदात आनंद

मानतात. आणि माझ्या यशाचा त्यांना अतीव अभिमान असतो. त्यामुळे माझी कला मला टोपलीखाली झाकून ठेवावी लागली नाही असे मी म्हणते.

**प्रश्न :-** दु:खावेग सहन करण्याचे सामर्थ्य कवितेतून कितपत मिळते?

**उत्तर :-** दु:खावेग सहन करण्याचे सामर्थ्य म्हणण्यापेक्षा दु:खाचा निचरा करण्याचे धैर्य नक्कीच कविता लेखन, वाचन किंवा रचनेतून मिळते. माझ्या कविता सामाजिक कार्यक्रमांतून गायल्या जातात. एका रसिकाने त्यांचा संसार तुटता तुटता वाचला असे कळविले आहे. ते कवितेची ध्वनीफित ऐकून घडले. मन सुन्न असताना कवितावाचन आपले दु:ख निवळायला मदत करते. अशा वेळी संवेदनशील मनाने केलेली कविता दु:खाचा निचरा करते असे म्हणता येईल.

**प्रश्न :-** बहुसंख्य कविता तुम्ही स्वानुभवातून लिहिल्या आहेत पण अशा काही कविता आहेत का की ज्या तुम्ही ठरवून लिहिल्या आहेत?

**उत्तर :-** खरं तर कविता निर्मिती तडफडीतून होते तेव्हा ती वास्तव असते. काही कवितांची जन्मकहाणी सांगता येते काहींची येत नाही. 'आला शब्द वयात' या ध्वनीफितीतील कविता स्वानुभवाने न ठरवता लिहिल्या आहेत. मी ठरवून लिहिलेली एकही कविता नाही, मात्र काही गाणी मी आधी, ठरवून लिहिली आहेत. एक म्हणजे मूकबधिरांच्या 'भगिरथ' ह्या पुनर्वसन केंद्रासाठी एक प्रार्थना आणि स्त्री पुनर्वसन केंद्र 'आधार' साठी एक गीत.

**प्रश्न :-** आपले येऊ घातलेले वाङ्मयीन अपत्य वगैरे?

**उत्तर :-** मी माझी अपूर्ण राहिलेली गद्यलेखन भूक भागविण्यासाठी यापुढे वेळ द्यावयाचे ठरविले आहे. त्यामुळे मी कथालेखन सुरु केले असून माझा एक कथासंग्रह प्रकाशनाच्या वाटेवर आहे. कथांवर शेवटचा हात फिरवण्याचे काम चालू आहे.

**प्रश्न :-** आता हा शेवटचा प्रश्न. ह्या छंदातून जीवन कितपत सार्थक झाले आहे?

**उत्तर :-** संपूर्ण सार्थक! माझी कविता नसती तर ओळखतं कोण संजीवनी बोकील ह्या जीवाला? माझी कविता मला सातासमुद्रापलिकडे घेऊन गेली. स्वित्झर्लंड, हॉलंडसारख्या ठिकाणी माझे कवितावाचन कार्यक्रम झाले. ध्वनीफिती निघाल्या. श्रोत्यांचं प्रेम लाभलं. 'काळीज कुपी', 'एकांत रेघेवर' ह्या माझ्या कवितासंग्रहांना पुरस्कार मिळाले. 'अंगण' कवितेला सुरेख कविता म्हणून गौरविले. हे केवळ माझ्या छंदामुळे साध्य झाले. एकूणच माझ्या अस्तित्वालाच आकार आला.

**कवयित्रीचा पत्ता :-**

**संजीवनी बोकील**
विजयलक्ष्मी अपार्टमेंटस्, रामबाग कॉलनी,
दौंड रोड, पुणे - ३८.
दूरध्वनी : ५४३८८४८/३३८८४८

**मुलाखत :-**

**श्री. सुधीर इ. शेटे/श्री. कौस्तुभ कर्णिक**
यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ,
विद्या प्रसारक मंडळाचे बांदोडकर विज्ञान महाविद्यालय केंद्र, ग्रंथपालन पदवी परीक्षा वर्ग, ठाणे.

* * *

" अहो ऐकलंत का? " चंपुकाकी आपल्या पतिराजांना म्हणाल्या, " हा पोपट पाळून दोन वर्षे झाली. पण एक शब्द बोलेल तर शपथ..."

" अग हो पण तू त्याला बोलू देशील तर ना ? पतिराज म्हणाले.

# 'जंगलांचा नाश'

*मार्चमध्ये एकवीस तारखेस आंतरराष्ट्रीय 'वनदिन' होता, तर या महिन्यात 'वसुंधरा दिन' आहे. त्या निमित्ताने हा विशेष लेख. - संपादक*

जंगल आणि माणूस यांचे फार जवळचे नाते आहे. आदिमानवाचा जन्मदेखील जंगलातच झाला. नंतर या आदिमानवांच्या संख्येत वाढ होत गेली. मानवाचा माणूस झाला. अनेक माणसे झाली. जंगलं हळू हळू कमी होत गेली आणि गावं, शहरे वसत गेली. जंगल म्हणजे केवळ जंगली पशुपक्ष्यांचे ठिकाण एवढीच ओळख राहिली. पण, या जंगलांवरच पृथ्वीचे तापमान, पर्जन्यमान, वातावरण अवलंबून आहे याची उशिराने का होईना थोडी जाणीव सर्वांना होऊ लागली. जंगल रक्षणाचे कायदे बनले. जंगलाच्या रक्षणासाठी माणसे नेमली गेली. पण, तरीही शहरीकरणाच्या नादात जगभरातील जंगलाचे प्रमाण कमी होत चालले आहे. पर्यावरणाचा समतोल साधायला जंगले महत्त्वाची भूमिका बजावत आहेत. जगभरातील जंगलाचे क्षेत्र कमी होत चालले असताना, भारतातही जंगलाचे एकूण क्षेत्रफळ कमी होत चालले आहे. भारताची लोकसंख्या एकीकडे झपाट्याने वाढत असताना जंगलाचे क्षेत्र कमी होत चालल्याने पर्यावरणदृष्ट्या फार मोठा फरक भारतात पडू लागला आहे.

जंगलाचा परिणाम हा केवळ पर्यावरणदृष्ट्या, वन्यप्राणीपशूबद्दलच होतो असे नाही. मोठ्या प्रमाणावर होणारी जंगलतोड सामाजिक आर्थिकदृष्ट्या देखील परिणाम करत असते. जंगलातून त्या परिसराच्या जवळ रहाणाऱ्या माणसांना पाणी, अन्न, लाकूड, जंगली औषधी वनस्पती व इतर उत्पादने मिळत असतात ही उत्पादने इतरत्र विकून तो गुजराण करु शकतो. जंगल आणि लोकसंख्या यांचे जगातील भारताचे स्थान पाहिले असता या दोहोतील दरी लक्षात येते.

जगाच्या एकूण लोकसंख्येच्या १६ टक्के लोकसंख्या व १५ टक्के प्राणी भारतात आहेत. परंतु हे सर्व राहतात केवळ २.४ टक्के भूभागावर. आणि जगातील एकूण जंगलाच्या केवळ १.६ टक्के जंगल क्षेत्र भारतात आहे. लोकसंख्या व जंगले या ताज्या अहवालात ती आकडेवारी देण्यात आली आहे. लोकसंख्या व जंगल यांचे प्रचंड व्यस्त प्रमाण भारतात असल्याने त्याचा परिणाम जंगलांवर होत आहे. जंगलातील साधन संपत्ती कमी होत चालली आहे. सरपण म्हणून झाडे तोडून लाकूड वापरणे व औद्योगिक कामासाठी लाकडाचा मोठ्या प्रमाणावर वापर होत असल्याने जंगलाचे क्षेत्र झपाट्याने कमी होत चालले आहे. केंद्र सरकारच्या इकॉनॉमिक सर्व्हेच्या आकडेवारीनुसार जळणासाठी सन १९९८-९९ सालात २३५ कोटी मीटर लाकूड तोड झाली. प्रत्यक्षात ४८ कोटी क्युबिक मीटर पर्यंतची जंगलाची क्षमता होती. दरवर्षी औद्योगिक वापरासाठी २८ कोटी क्युबिक मीटर लाकडाची गरज भासते. प्रत्यक्षात अशा लाकडाची उत्पादन क्षमता आहे १२ कोटी क्युबिक मीटर. याचा अर्थ दुप्पटीने लाकूड तोडले जाते.

लोकसंख्यावाढीच्या प्रचंड वेगाचा ताण पर्यायाने जंगलांवर पडत आहे. १९५१ साली केवळ ३६१ कोटी लोकसंख्या असणाऱ्या भारताची २००० साली लोकसंख्या एक अब्जावर जाऊन पोचली. यापैकी ६५० कोटींवर लोकसंख्या ग्रामीण भागातील आहे. आणि जंगले ही प्रामुख्याने ग्रामीण भागाजवळच आहेत. ग्रामीण भागात असणारी पाळीव जनावरे देखील जंगल ऱ्हासाला अप्रत्यक्षरित्या कारणीभूत आहेत. गाय, बकऱ्या, घोडे सारखी जनावरे जमिनीवरील कोवळ्या हिरव्या वनस्पती फस्त करतात. दाट जंगलात चरायला ही पाळीव जनावरे

जात नाहीत. जंगलाभोवतालची हिरवळ, झाडे जनावरांकडून फस्त केले जात असल्याने या ठिकाणी नवीन झाडे येत नाहीत. जवळपासचे गवत, चारा, झाडे संपली की, ही जनावरे जंगलात थोडं आत शिरुन तेथील झाडे, गवत संपवू लागतात.

१९९२ च्या आकडेवारीनुसार भारतात पाळीव जनावर गाय, बैल २०४ कोटी (१९५१ साली १५५ कोटी), म्हैस-८३ कोटी, मेंढ्या-५० कोटी, बकरी-११५ कोटी (१९५१ साली फक्त ४७ कोटी), डुक्कर-१२ कोटी, उंट-१.३ कोटी व इतर १.३ कोटी संख्या आहे. भारतीय जंगलांच्या केलेल्या सर्वेक्षणानुसार भारताच्या एकूण भूभागापैकी २३ टक्के भूभाग जंगलाने वेढलेला आहे. असे सांगितले जाते. मात्र भारतीय वन सर्वेक्षण १९९९ च्या अहवालानुसार प्रत्यक्षात ६३.३ कोटी हेक्टर क्षेत्र (१९ टक्के) जंगलाने व्यापलेले आहे.

भारतातील २५ राज्यातील जंगलाच्या क्षेत्राचा आढावा घेतल्यास मिझोराम मध्ये सर्वाधिक ८९% क्षेत्र जंगलाने व्यापलेले आहे. त्या खालोखाल नागालँड ८६%, अरुणाचलप्रदेश ८२%, मणिपूर ७८% जंगल क्षेत्र आहे. मेघालयामधील ७०% भूभाग जंगलानी वेढलेला आहे. सर्वाधिक कमी जंगल क्षेत्र हरियाणा राज्यात केवळ १% आहे. आपल्या शेजारील गुजरातमधील फक्त ६% भूभाग जंगलाने व्यापलेला असला तरी खाडी किनारी असणाऱ्या जंगलाने खारफुटीच्या वनाने ९११ चौरस किलोमीटर क्षेत्र व्यापलेले आहे. महाराष्ट्रात एकूण १५टक्के वनक्षेत्र आहे. गोवा ३४टक्के, बिहार १५टक्के, जम्मू-काश्मीर ९ टक्के, केरळ २७ टक्के, पंजाब ३ टक्के, राजस्थान ४ टक्के, पश्चिम बंगाल ९ टक्के भूभाग जंगलाने व्यापला आहे.

मागील दशकात आंध्रप्रदेश, आसाम, हिमाचल प्रदेश या तीन राज्यातील जंगलाच्या क्षेत्रात झपाट्याने घट झाली. या उलट महाराष्ट्र, गुजरात सारखी राज्ये जंगलाच्या क्षेत्र वाढीच्या दृष्टीने प्रयत्न करीत आहेत. ग्रामीण भागातील लोकसंख्या वाढली की सरपणासाठी, बांधकामासाठी, पाळीव जनावरांसाठी जंगलाचा वापर मोठ्या प्रमाणावर होतो. शहरी भागात बांधकामासाठी, कागद बनविण्यासाठी लाकडाचा वापर वाढतो. पेट्रोलजन्य पदार्थांच्या किंमतीत होणाऱ्या वाढीने सरपणासाठी लाकडाचा वापर करण्याकडे कल साहजिकच वाढत चालला आहे. स्वयंपाकासाठी जळण म्हणून लाकडाचा वापर खेड्यातील ७८ टक्के जनता आजही करते. शहरात बेकरी उद्योगवाले, तसेच मृतदेह जाळण्यासाठी लाकडाचाच वापर केला जातो. एक मृतदेह जाळण्यासाठी साधारणतः २०० किलो लाकूड वापरले जाते. आणि यासाठी लाकूड फार स्वस्त म्हणजे मुंबईसारख्या शहरात २५. किलो दराने लाकूड विकत मिळते. डिझेल शववाहिनी हा पर्याय येऊनही धार्मिक बंधनाच्या जोखडातून आपण अद्याप बाहेर पडत नसल्याने लाकडाचा वापर मोठ्या प्रमाणावर होतो.

सरपणासाठी लाकूड वापरले जात असल्याने सरपण जमा करण्याची जबाबदारी घरातील स्त्रीवर येते. घराच्या जवळ पूर्वी मिळणारे लाकूड संपल्याने दूरवरुन तोडून आणावे लागते. यात स्त्रियांचा वेळ व श्रम जातात. जंगलात दूरवर जावून लाकडे तोडून मोळी आणली जाते. कष्टाची कामे त्यांनाच करावी लागतात. दिवसाचे ४-५ तास या कामी जातात. शिवाय लाकडांवर जेवण बनवताना होणाऱ्या धुराचा मोठा परिणाम त्यांच्या आरोग्यावर होत असतो. सकाळच्या स्नानासाठी लागणारे गरम पाणी करण्यापासून चहा, नाश्ता, जेवण आदि सर्व कामाला जळण म्हणून लाकडाचाच वापर केला जातो. यामुळे ग्रामीण भागात मोठ्या प्रमाणावर लाकूड लागते. ग्रामीण भागात जळणासाठी लाकडाबरोबर कोरडा कचरा, जनावरांच्या शेणापासून व कोंडा वापरून बनलेल्या शेणी वापरल्याने धूर मोठ्या प्रमाणावर होतो. याचा परिणाम त्या स्त्रीवर तसेच घरातील व्यक्तींवर होत असतो.

शशिकांत कोटेकर, ठाणे.
पेजर ९६२८-२८४२७७

•••

# शिक्षण क्षेत्रात माफिया !

*ठाण्याच्या समर्थ सेवक मंडळाच्या गतवर्षीच्या कै. गो. गो. पंडीतराव वक्तृत्व स्पर्धेत पदवी गटात प्रथम क्रमांक मिळालेले भाषण येथे देत आहेत. - संपादक*

गेल्या काही दिवसांमध्ये काही बातम्या आपल्यापर्यंत येऊन पोचल्या असतील, असं म्हणण्यापेक्षा, आपल्यावर येऊन आदळल्या असतील असं म्हणणंच अधिक योग्य ठरेल.

१. बारावीच्या परीक्षेत पहिला आलेला मदन नागरगोजे याच्या यशाच्या श्रेयासाठी एका खाजगी क्लासचालकाची खुद्द शिक्षणमंत्र्यांनाच दमदाटी.

२. नागपूर विद्यापीठात विद्यार्थ्यांच्या गुणवाढीच्या गैरव्यवहारा प्रकरणी स्वत: प्र-कुलगुरु आणि मुख्य रजिस्ट्रार यांचाच हात.

३. पुणे विद्यापीठात परीक्षेच्या काळात एका खाजगी शिक्षणसंस्थेकडून प्रश्न पत्रिकेत परस्पर बदल.,

खरं म्हणजे या तीन बातम्या नसून, आपल्या समाजामध्ये शिक्षणाचं जे भीषण विकृतीकरण चालू आहे त्याचीच ही तीन वेगवेगळी दर्शनं आहेत. शिक्षणाबाबतचा हा अंध:कार एकीकडे इतके डोळे दिपवून टाकत असताना दुसरीकडे मात्र आमच्या समाजाचं लक्ष एकाच प्रश्नाकडं लागून राहिलंय, 'कौन बनेगा करोडपती?'

या वरच्या बातम्यांमध्ये, आजच्या आपल्या शिक्षणामध्ये आणि या कार्यक्रमात साम्य असं आहे की, ज्याप्रमाणे या कार्यक्रमात विचारलेल्या प्रश्नाच्या आशयाबद्दल कोणालाच आस्था नसते, तर सगळ्यांच लक्ष असतं ते उत्तरामुळे वाढत जाणाऱ्या दुप्पट होत जाणाऱ्या पैशाकडे. त्याचप्रमाणे आजच्या आमच्या शिक्षणात, आजच्या शिक्षकाला, विद्यार्थ्यांला प्रश्नपत्रिकेमधल्या प्रश्नाच्या विषयाचे मुद्दे किंचितही महत्त्वाचे वाटत नाहीत तर त्या प्रश्नांची उत्तरं एका तथाकथित बरोबर पद्धतीने दिल्यानंतर आपल्या हातातील पैसा मिळवण्याची सत्ता, मिळवण्याची साधन दुप्पट होत जातात, वाढत जातात. त्यालाच सर्वाधिक महत्त्व दिलं जातं. आणि असा हा आजच्या आमच्या शिक्षणाचा पट आहे आणि दुर्दैवाने कौन बनेगा करोडपती हे जणू आमच्या शिक्षणाचं Title Songच झालेल आहे. म्हणजेच कौन बनेगा करोडपती ही मानसिकता आमच्या समाजामध्ये भिनत चाललेली आहे. आणि अशा कष्ट न करता, श्रम न करता पैसा मिळवण्याच्या जुगारी मनोवृत्तीमुळेच आमच्या शिक्षणामध्ये आज ही माफियागिरी वाढलेली दिसते, की जी आजच्या शिक्षणाचा एक अविभाज्य भागच बनलेली आहे. आणि अशा भीषण वास्तवाच्या पार्श्वभूमीवर आजचा आपला विषय आहे. शिक्षण क्षेत्रात माफिया.

आता इथे या शब्दाची मोठी गंमत आहे. आता एक काळा चष्मा डोळ्यावर लावणारा, डोक्यावर काळी हॅट घालणारा, अंगात लांब काळा कोट घालणारा आणि रात्रीच्या वेळी बेकायदेशीर धंदे करणारा असा एक मनुष्य अशी सर्व साधारणपणे तुमच्या मनात माफिया या शब्दाची कल्पना असते. पण या वेळी प्रश्न असा पडतो की अशा प्रकारे परीक्षा व्यवस्थेमध्ये संपूर्णपणे गोंधळ उडवून देणारे, विद्यार्थ्यांना कॉपी विकणारे शिक्षक, मुख्याध्यापक, गैरव्यवहारात गुंतलेले स्वत: प्राध्यापक, त्यांना विकत घेणारे विद्यार्थी आणि त्यांचे पालक, खुद्द शासन संस्थेलाच आव्हान देणारे खाजगी क्लासचालक आणि राजकीय आश्रय घेऊन पूर्णपणे कायद्याच्या चौकटीत राहून, प्रचंड गैरव्यवहार करणारे तथाकथित शिक्षणमहर्षी संस्थाचालक यांना आपण काय म्हणायचं? शिक्षण क्षेत्रात पांढऱ्या कोटात वावरणारे हे खरे माफिया आहेत की जे कोणत्याच कायद्याच्या चौकटीत अडकूच शकत नाहीत.

---

आयुष्यातील पहिल्या बक्षिसाचे मोल प्राणापलिकडे असते.

म्हणूनच माफिया या संकल्पनेचा विचार करताना आपण त्याचं मोजमाप आपण कायदेशीर मोजपट्टीवर नाही तर नैतिकतेच्या मोजपट्टीवर केलं पाहिजे, असं मला वाटतं. म्हणूनच माफिया या शब्दाचा आपण शब्दशः अर्थ न घेता माफिया म्हणजे माफिया मानसिकता असा अर्थ घेतला पाहिजे. हे माफिया एखाद्या हिमनगासारखे असतात की ज्याचा फारच थोडा भाग हा पाण्याबाहेर असतो आणि आपल्याला मात्र तो तेवढाच दिसतो. त्यातला मुख्य भाग हा पाण्याच्या आतच दडलेला असतो. म्हणूनच लांबून पाहणाऱ्याला त्या हिमनगाची विध्वंसक ताकद लक्षात येत नाही. जो त्याला धडकतो त्यालाच ती समजते आणि त्याच्यामुळेच आपला संपूर्ण समाज एकत्रितपणे या माफिया विरुद्ध कधीच पेटून उठू शकत नाही. म्हणजेच शिक्षण क्षेत्रात माफिया असणं ही गोष्ट खरी चिंतेची नाही तर माफिया आपल्यामध्येच दडलेले असतात ही खरी चिंतेची बाब आहे. म्हणूनच हा संपूर्ण समाजाच्याच नैतिकतेचा प्रश्न आहे.

आता, शिक्षणामध्ये या माफियांचा शिरकाव कसा झाला हे जाणून घेण्यासाठी, आपण आपल्या समाजव्यवस्थेमध्ये आणि पर्यायानं शिक्षणव्यवस्थेमध्ये जे काही बदल घडून आले जी स्थित्यंतरे घडली ही देखील लक्षात घेणं आवश्यक ठरतं. १९४७ साली स्वातंत्र्यानंतर आपण कल्याणकारी राज्य या प्रकारची राज्यव्यवस्था स्वीकारली आणि त्या खाली आपला समाज घडवायला सुरुवात केली. म्हणूनच शिक्षण, आरोग्य इ. सारख्या क्षेत्रांमध्ये मोठ्या प्रमाणावर सरकारी अनुदानं दिली गेली आणि त्यातून अनेक मोठ्या संस्था, विद्यापीठे यांची उभारणी झाली. याचा फायदा असा झाला की मुली आणि विशेषतः ग्रामीण भागातले विद्यार्थी त्यांतून अधिक प्रमाणात शिक्षण घेऊ लागले. त्यामुळे शहरी विद्यार्थी आणि ग्रामीण विद्यार्थी ही दरी आमच्या समाजात कमी होऊ लागली आणि आमचा समाज त्या वेळी अतिशय मोठ्या शैक्षणिक क्रांतीच्या उंबरठ्यावर उभा होता. पण नेमक्या त्याच वेळी म्हणजे १९८५ पासून आपण मुक्त बाजारपेठ या स्वरूपाची पूर्णपणे भांडवली अर्थव्यवस्था स्वीकारण्यास सुरुवात केली आणि १९९१ ला आपण मुक्त अर्थव्यवस्था स्वीकारली देखील. याचाच अर्थ असा, शिक्षण, असो, आरोग्य असो, इतर कोणत्याही मूलभूत सेवा असोत, त्या बाजारात मुक्तपणे ठरतील अशा किंमतीला विकतच घ्याव्या लागतील. सरकार कशावरही अनुदान देणार नाही. ज्याला परवडेल त्यानं घ्यावं नाही त्यानं घरी बसावं. म्हणजेच शिक्षणाचं पूर्णतः बाजारीकरण करण्यात आलं, शिक्षण ही एक वस्तू म्हणून बाजारात विक्रीला ठेवण्यात आली.

मित्रांनो, लक्षात घ्या, कोणत्याही शिक्षणाची तीन मूलभूत उद्दिष्टं असतात. एक म्हणजे माणसाला एक चांगला माणूस बनवणं, दुसरं म्हणजे माणसाला एक चांगला नागरिक बनवणं आणि तिसरं म्हणजे माणसाला उत्पादक बनवणं किंवा त्याला एखाद्या अभ्यासामध्ये विशेष तज्ज्ञ बनवणं. जेव्हा आपण १०+२+३ ही शिक्षण पद्धती स्वीकारली त्या वेळी पहिल्या दहा वर्षांमध्ये सर्व विषयांचं एक मूलभूत ज्ञान जे सर्वांना असणं अपेक्षित आहे. त्याचबरोबर माणसाला त्याची राज्य व्यवस्था, त्याचे हक्क यांची जाणीव, हे सगळं या १० वर्षांत अपेक्षित आहे. म्हणजेच माणसाला एक चांगला माणूस बनवणं किंवा एक चांगला नागरिक बनवणं हे इथं अभिप्रेत आहे. अधिक स्तरांमध्ये छोटे व्यवसाय करण्यासाठीचं शिक्षण म्हणजेच व्यावसायिकीकरणाचा पाया घालणं अभिप्रेत आहे. त्याचबरोबर बारावी नंतर अर्थार्जनाचं दुसरं कोणतंही साधन नाही म्हणून केवळ उच्च शिक्षणाकडे वळणाऱ्या विद्यार्थ्यांचा प्रचंड लोंढा. याने थांबविणे अपेक्षित आहे. म्हणजेच विद्यार्थ्याला उत्पादक बनविणं यात अभिप्रेत नाही. +३ स्तरामध्ये विद्यार्थ्याला उत्पादक बनविणं किंवा त्याला एखाद्या अभ्यासात विशेष तज्ज्ञ बनविणं अभिप्रेत आहे.

पण आज मात्र काय होतयं? बारावीच्या अभ्यासक्रमावर फक्त परीक्षा घेऊन त्यावर उच्च शिक्षणाचे प्रवेश ठरत आहेत म्हणजेच ज्या शिक्षणाचा मूळ उद्देशच हा मुळी उत्पादक बनविण्याचा नाही. सार्वत्रिकीकरणाचा

आहे. त्याच्यावर परीक्षा घेऊन, माणसाला उत्पादक बनविण्याच्या शिक्षणाला प्रवेश दिला जातोय. आणि म्हणूनच ही परीक्षापद्धती, प्रवेशपद्धती पूर्णपणे अन्यायकारक आणि तर्कशास्त्राच्या दृष्टीने विसंगत आहे. त्याच्यामुळे आज बारावी पास झालेला प्रत्येक जण उच्च शिक्षणासाठी प्रयत्न करीत आहे आणि उच्चशिक्षणाची संस्थात्मक मागणी दिवसेंदिवस प्रचंड प्रमाणात वाढतच आहे. आणि म्हणूनच आज आपल्याला हे जे विना-अनुदानित खाजगी शिक्षणसंस्थांचं पेव फुटलेलं दिसतं त्याचं मूळ कारण हे आहे. आणि या शिक्षणाच्या झालेल्या बाजारीकरणाला, त्यात शिरलेल्या माफियागिरीला या खाजगी शिक्षण संस्था मोठ्या प्रमाणावर जबाबदार आहेत.

शिक्षणामध्ये ही माफियागिरी येण्याचं आणखी एक मुख्य कारण म्हणजे खाजगी कोचिंग क्लासेस. या महाविद्यालयात जाणाऱ्या विद्यार्थ्यांनी स्पर्धेत पुढे येण्यासाठी खाजगी क्लासची मदत घेतली आणि त्यांना यश मिळतं असं दिसताच इतरांनीही त्याच अनुकरण सुरु केलं. त्याच्यामुळे आजच्या या शिक्षणव्यवस्थेमध्ये आणखी एक समांतर संस्था निर्माण झाली त्यावर कोणतंही नियंत्रण नाही, जी पूर्णपणे खाजगी लोकांच्या नियंत्रणाखाली आहे.

आणि अशा प्रकारे या खाजगी शिक्षणव्यवस्थेला जन्म देणारा, त्याच्यावर नियंत्रण ठेवणारा एक अतिशय प्रबळ असा धनिकांचा भांडवलदारांचा वर्ग आमच्या समाजामध्ये आहे, की ज्यांची नैतिकता ही सामान्य समाजाच्या पूर्णपणे विरोधात गेलेली आहे. कायदे करणारी यंत्रणा, धोरणांची अंमलबजावणी करणारी यंत्रणा, प्रसारमाध्यमं अशी सर्व सत्तास्थानं आणि पैसा हे सर्व या वर्गाच्या हातात केंद्रित झालेलं आहे. म्हणूनच शिक्षण क्षेत्रातल्या माफियांचा मुख्य प्रश्न हा कायदा, समाज आणि नीती या तिन्हींच्या एकमेकांपासून उडालेल्या फारकतीमुळे झालेला आहे.

मी मघाशी म्हटल्याप्रमाणं, ज्यांच्या हातात सत्ता आहे. पैसा आहे असा एक वर्ग आणि ज्यांच्याकडे यापैकी काहीच नाही असा एक वर्ग. अशा दोन वर्गांमध्ये आमचा समाज पूर्णपणे दुभंगला गेला आहे. म्हणूनच हा प्रश्न फक्त कायद्याचा नाही, नैतिकतेचा नाही, तर तो संपूर्ण समाजाच्या दुभंगलेपणाचाच प्रश्न आहे आणि ह्या दुभंगांपैकी आपण कोणाची बाजू घेणार ह्यातच या प्रश्नांच उत्तर दडलेलं आहे असं मला वाटत.

यासाठी शेवटी एक कथा सांगतो-

एकदा एका आमराईमध्ये एक अगदी पाच-सहा वर्षांचा लहान मुलगा झाडावरून पडणाऱ्या कैऱ्या पटकन उचलून चोरुन नेत होता. एवढ्यात त्या बागेचा माळी त्या ठिकाणी आला आणि त्यानं त्या मुलाला कैऱ्या चोरताना पाहिलं. माळ्यानं मुलाला धरलं आणि त्याला ओरडायला लागला," अरे, तू एवढा छोटा असूनही अशी चोरी करतोस? तुला घरी हेच शिकवतात का? तुझ्यावर हेच संस्कार होतात का? तुझ्या वडिलांना मग मला भेटायला पाहिजे. कुठे आहेत तुझे वडिल?" हे पोरगं हसलं आणि त्यानं शांतपणं वर बोट दाखविलं. तर मित्रांनो, त्याचे वडिल झाडावरून कैऱ्या खाली पाडण्याच काम करत होते.

आता २१ व्या शतकाकडे जाताना आपल्याला या माळ्याची भूमिका करायची आहे. या खालच्या मुलावर तर आपल्याला चांगले संस्कार करायचे आहेत त्याच बरोबर त्याचे जे वडिल झाडावर बसलेत त्यांनाही आपल्याला शासन करायचं आहे. आणि असं जर झालं तरच २१ व्या शतकात आपण बलशाली भारत म्हणून वाटचाल करु शकू असं मला वाटतं. धन्यवाद !

**निकित अभ्यंकर**
शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय,
शिवाजीनगर, पुणे - ४११ ००५.

• • •

दुःखी माणसाला समोरचा माणूस सुखी आहे असे वाटत असते.

# ग्रंथप्रसाराच्या माझ्या प्रयोगाची फलश्रुती

*श्री. ल. टिळक हे गेली अनेक वर्षे ग्रंथ प्रसाराच्या दृष्टीने ठाण्यामध्ये सातत्याने काम करीत आहेत. त्यांच्या अनुभवांवर आधारित व सदर लेख आम्ही देत आहोत - संपादक*

फलश्रुती ही एखाद्या कर्माचे किंवा व्रतचरणाचे फल सांगणारा ग्रंथभाग असतो हे आपण जाणताच.

१ मार्च १९६४ पासून, 'साहित्य स्नेही मंडळ' या नावाने सामुदायिकरित्या ग्रंथखरेदीचे कार्य मी चालू केले. ते कार्य ग्रंथखरेदी व ग्रंथप्रसाराचा एक प्रयोग म्हणून मान्यता पावले हे खरे आहे. ग्रंथखरेदीचे हे कार्य गेली ३७ वर्षे म्हणजे, तीन तपाहून अधिक काळ चालूच आहे. अव्याहतपणे चालू आहे, ही ह्या प्रयोगाची फारतर एक फलश्रुती आहे असे म्हणता येईल.

ग्रंथखरेदीची कार्यपद्धती अशी आहे :-

आठ-आठ जणांचे चार गट आहेत. या गटांचे सभासद, दर चार महिन्यांनी प्रत्येकी १४० रुपये वर्गणी जमा करतात. ह्या मुळे प्रत्येक वर्षाला ४२० रुपये जमा होतात. प्रत्येक गटाला १६ याप्रमाणे ६४ पुस्तकांची, चार महिन्यांसाठी पुस्तके खरेदी केली जातात. दर महिन्याच्या दुसऱ्या व चौथ्या शनिवारी, प्रत्येक वेळी दोन पुस्तके, एकाची दुसऱ्याला अशा पद्धतीने वाचनासाठी दिली जातात. वर्षाच्या अखेरीस दर्शनी मूल्यानुसार, प्रत्येक सभासदाच्या वार्षिक वर्गणी (रु. ४२०) इतकी पुस्तके ३२ गट तयार करण्यात येतात व सोडत पद्धतीने म्हणजे वर्षभरात, सभासदांना १३४४० रुपयांची (४२० x ३२ स.) पुस्तके वाचावयास मिळून, व्यक्तिगत संग्रहासाठी ४२० रुपयांची पुस्तके मिळतात.

पुस्तक खरेदी व संग्रहाचा हा सामुदायिक प्रयोग प्रकाशक, पुस्तक विक्रेते, संपादक, ग्रंथप्रेमी यांच्या इतका पसंतीस आला आहे की गेल्या ३७ वर्षात (एखाद-दुसऱ्या वर्षाचा अपवाद वगळता) प्रत्येक वर्षी मंडळाच्या ग्रंथप्रसाराच्या कार्याला प्रसिद्धी मिळाली आहे. हे -ललित, साप्ताहिक, विवेक, महाराष्ट्र टाईम्स, नवशक्ती, सत्यकथा, स्वराज्य, वाङ्मयशोभा, लोकवाङ्मय ह्या सारख्या नियतकालिकांच्या नियमित वाचकांना माहीत आहेतच. एवढेच नव्हे, तर आकाशवाणी व दूरदर्शनच्या माध्यमातूनही ह्या उपक्रमाची माहिती दिली गेली आहे. 'प्रकाशन डायरी', 'प्रकाशन विश्व' मध्ये ह्या उपक्रमाचा न विसरता उल्लेख असतो.

मराठी वाङ्मयाचे साक्षेपी विचारवंत कै. डॉ. शं.गो. तुळपुळे ह्यांनी लिहिलेल्या 'मराठी ग्रंथ निर्मितीची वाटचाल' ह्या ग्रंथातही ह्या उपक्रमाची दखल घेतली आहे.

प्रसिद्ध लेखक श्री. जयवंत दळवी, प्रकाशन वामन विष्णु भट, ग्रंथ चळवळीचे धुरीण वासुदेव विष्णु भट, वाङ्मय शोभा मासिकाचे समर्थ संपादक श्री. म.ग. केळकर अशा कित्येक नामवंतानी हा उपक्रम ग्रंथप्रेमींच्या समोर यावा म्हणून सातत्याने पाठपुरावा केला आहे. इतकी ही योजना पसंतीस आली, ही ह्या प्रयोगाची दुसरी फलश्रुती होय.

तिसरी - आणि अत्यंत महत्त्वाची फलश्रुती म्हणजे गेल्या ३७ वर्षात एकलाख सतराहजार तीनशे सदतीस (१,१७,३३७) रुपयांची, तीनहजार तीनशे चौदा पुस्तके (३३१४) विकत घेऊन ग्रंथखरेदीस प्रत्यक्ष हातभार लावण्याचे मिळालेल भाग्य, जे अधिक आनंददायी आहे.

नुसती फलश्रुतींची यादी देऊन ह्या लेखाची पाने वाया घालवणे वावगे ठरेल. आम्ही एवढे सगळे करून, त्याचे प्रतिबिंब, अशी अनेक मंडळे स्थापन होऊन का प्रत्ययास येत नाही, ह्याचा येथे उहापोह हवाच.

३४ वर्षांपूर्वी, म्हणजे फेब्रु. १९६७ मध्ये कै. जयवंत

दळवी यांनी 'ग्रंथप्रेमी' या नावाने सत्यकथेचा फेब्रु. १९६७ च्या अंकामध्ये जो लेख लिहिला. त्या लेखात 'साहित्य स्नेही मंडळाची' माहिती देऊन असे म्हटले की, 'संबंध महाराष्ट्रात बारा-बारा जणांची अशी एक हजार मंडळे स्थापन झाली तर वर्षाकाठी सुमारे तीन लाख रुपयांचा जादा खप होईल हे लक्षात घेण्यासारखे आहे.'

महाराष्ट्रातील ग्रंथप्रसाराची ही दुर्दैवी बाब आहे की, ह्या मंडळाची कार्यपद्धती अनेकांनी समजावून घेतली; पण नेट लावून शंभर गटही स्थापन झाले नाहीत. ह्याचे कारण प्रयत्नांची कमतरता असू शकेल किंवा डॉ. तुळपुळे यांनी आपल्या ग्रंथात नमूद केल्याप्रमाणे, असल्या प्रयोगांचे यशापयश सामान्य वाचकांच्या ग्रंथाभिरुचीवरच अवलंबून राहणार हे विसरून चालणार नाही.' ह्या विधानातील सत्याशी निगडीत असू शकेल.

थोडक्यात आमच्या ग्रंथप्रसाराची फलश्रुती लाभदायक होण्यासाठी आमच्या सारखे पुस्तक खरेदीचे गट-व्यवसायाच्या ठिकाणी, राहत्या वस्तीत चालू होण्यासाठी त्या त्या ठिकाणच्या ग्रंथप्रेमींनी, जनसामान्यात ग्रंथाभिरुची निर्माण करुन, गट स्थापन करण्यासाठी पद्धतशीर चळवळच करावयास हवी. असे गट ग्रंथ खरेदीला तर हातभार लावतीलच, त्याशिवाय लेखकांकडून लेखनाची गुणवत्ता, प्रकाशकांकडून ग्रंथांचे योग्य मूल्य व विक्रेत्याकडून खरेदीवर योग्य ती सवलत मिळविण्यासाठी 'सबळ' ठरतील!

सर्व ग्रंथप्रेमींनी आस्थेने धडपड करुन ग्रंथखरेदीसाठी अधिकाधिक गट स्थापन झाले तर आमच्या ग्रंथप्रसाराच्या प्रयत्नांनी फलश्रुती कोणीही हेवा करावा अशी होईल, हे मात्र खरेच ! तो सुदिन झणी येवो !!

**श्रीकृष्ण ल. टिळक**
सोनल अपार्टमेंट, अग्यारी लेन, जांभळीनाका, ठाणे.
दूरध्वनी: ५४१०४०५

• • •

## मुखपृष्ठाविषयी थोडेसे

२० वे शतक संपून २१ वे शतक सुरु झाले. शतकांचा असा पालट आजवर अनेकदा झालेला असला तरी हे २१ वे शतक क्रांतिकारी असणार आहे. कारण हे शतक मानवी अस्तित्वाचीच शंका घेऊन उगवलं आहे.

खालवणारं व्यक्तिगत जीवन, ढासळणारी समाजरचना आणि खंगणारं पर्यावरण या दिशेने चाललेला मानवाचा प्रवास पाहून कोणाचही मन अशा शंकेने व्यथित होईल.

आपल्या सभोवतालची परिस्थिती इतक्या नकळत हळूहळू बिघडत चालली आहे की तिची जाणीवही आपल्याला नाही. दिवसेंदिवस वाढणारी लोकसंख्या, जंगलतोड पर्यायाने पृथ्वीचे तापमान एक ना एक दिवस या सगळ्यांचा स्फोट होईल. पृथ्वी हा एकच ग्रह असा आहे की ज्यावर सजीवाची उत्पत्ती झाली कारण पृथ्वीवरचे पर्यावरण हे सजीवांना अनुकूल आहे. पण आज हव्यासापोटी मानवान मात्र ते प्रतिकूल बनवण्याचा प्रयत्न चालवला आहे. आज झाडे लावण्याऐवजी तोडण्याचा वेग जास्त आहे. त्यामुळे या प्रकारची साधनसंपदा हळू हळू घटत चालली आहे. प्रचंड वापरामुळे तिचे साठे संपत चालले आहेत. खाणीतील धातू कमी होत आहेत, दगडी कोळसा कमी होत आहे. पेट्रोलियमचा साठा संपत आला आहे.

या सगळ्याचा परिणाम म्हणून पर्यावरणाच सातत्य आणि मानवाची प्रगतीच धोक्यात आली आहे. हा धोका लक्षात घेऊन 'वसुंधरा दिन' आणि 'जलसंपत्ती दिन' याचे औचित्य साधून पर्यावरण वाचवू. पृथ्वीलाही वाचवू आणि पर्यायाने मानवाच्या अस्तित्वालाही.

- सौ. मंजिरी दांडेकर

# डाऊश लँड - (जर्मनी)
## लेखांक १

*प्रवासवर्णन हा व्यक्तिसापेक्ष साहित्य प्रकार आहे. श्री. अजित पाटील यांच्या निरीक्षणातून जर्मन देशाची कल्पना येऊ शकते. - संपादक*

२८ नोव्हेंबर १९९९ दुपारच्या लुफ्तान्सा या जर्मन सरकारी कंपनीच्या विमानाने लंडनहून हॅमबर्गला पोहोचलो. तेव्हा स्थानिक वेळेनुसार संध्याकाळचे सव्वा पाच वाजले होते. मागच्या वर्षी जर्मनीला गेलो, तेव्हा रोटोडॅम (नेदरलँडस) वरुन युरेलनीला गेलो होतो. एअरपोर्टवरून बसनं हॅमबर्ग शहरात आलो. प्रत्येकी साडे आठ डॉइश मार्क झाले. त्यावेळेच्या हिशेबाप्रमाणे एक डॉलर म्हणजे साधारणतः दोन डॉइश मार्कस्, तर एक डॉइश मार्क म्हणजे एकवीस रुपये, असा हिशेब. टॅक्सी केली असती तर ऐंशी पंच्याऐंशी डॉइश मार्कस् झाले असते. मागच्या वेळेप्रमाणेच याही वेळेला हॅमबर्ग रेल्वेस्टेशन जवळच हॉटेल 'मेट्रो मेक्युर' मधे बुकिंग केल होत. आपल्याकडे जसं मुंबईच बॉम्बे केल, चेन्नईच मद्रास केलं तसंच जगानं 'डाऊश लँडच' जर्मनी केल. लग्नानंतर नाव बदललं तरी मुलीला माहेरी पहिल्याच नावान बोलावतात. तसाच प्रकार इथं जर्मनांना त्यांची डाऊश लँडचं. माहेरी जाल तेव्हा माहेर विसरू नका. जो प्रकार 'जर्मनी' बाबत तोच प्रकार 'रेल्वेस्टेशन' बाबत. मुख्य रेल्वेस्टेशनला 'हाऊप्टबनाऊफ' म्हणातात आणि लिहिताना त्याचा शॉर्टफॉर्म असा HBF लिहितात. बिझनेससाठी केवळ हॅमबर्गच्या आसपासच नव्हे तर संपूर्ण जर्मनीभर फिरावं लागणार होत. त्यामुळ रेल्वेस्टेशन जवळचं हॉटेल बुक केल होतं. युरेलचा पास असल्यामुळ रेल्वेसाठी जादा खर्च होणार नव्हता. युरेल पास केवळ लांबच्याच प्रवासाला नाही तर लोकल ट्रेन साठी सुद्धा चालतो. मात्र हा प्रकार लंडन, पॅरिसमधे नाही, तिथं मात्र वेगळा लोकल पास काढावा लागतो.

जर्मनीत विमानतळ, रेल्वेस्टेशन बाहेर आल्या आल्या. आपल्याला जर कशाचा धक्का बसत असेल तर तो 'मर्सिडीज टॅक्सी' चा. मुंबईत जशा काळ्या पिवळ्या प्रिमीयर पद्मिनी, तशा जर्मनीत क्रीम कलरच्या मर्सिडीज टॅक्सी. भारतात स्टेट्स सिंबॉल असलेल मर्सिडीजचं 'इ' क्लास मॉडेल म्हणजे इथली टॅक्सी ! यावरूनच इथल्या राहणीमानाचा अंदाज यायला हरकत नाही. ब्रिटीश भारतात आले, दीड एकशे वर्षे राहिले. त्यामुळं आपल्याला त्यांच्या विषयी खडानखडा माहिती आहे. पण याच्या अगदी उलट परिस्थिती फ्रेंच आणि जर्मनीबाबत. जगावर अधिपत्य गाजवणाऱ्या या देशांविषयी आपल्याकडं विशेषतः महाराष्ट्रात फारच त्रोटक माहिती आहे म्हणून हा खटाटोप. आजही अमेरिका आणि जपान नंतर जर्मनी आणि फ्रान्सचा उल्लेख आर्थिक महासत्ता असा केला जातो. त्यांची दुसऱ्या महायुद्धानंतर पुनर्निमिती त्याच वेळेला सुरू झाली, जेव्हा आपण आपलं राष्ट्रउभारणीला सुरुवात केली. तरीही त्यांच्या आणि आपल्या प्रगतीत एवढी तफावत का?

जर्मनीत रहाणीमान कसं आहे, ते काय खातात, तिथं वेगवेगळ्या वस्तुंचे भाव किती आहेत, त्यांची नैतिक मूल्ये कोणती, इत्यादी गोष्टींचा घेतलेला हा आढावा.

जर्मनीत छोट्या गावात रहायला निदान चार हजार डॉइश मार्कस् महिन्याला हातात आले पाहिजेत. तर शहरात सहा हजार. टॅक्स खूपच जास्त आहे, अशी भावना इतर सर्व देशांप्रमाणे जर्मन नागरिकांतही आहे. सेक्रेटरी म्हणून काम करणारीला महिना चार हजार डॉइश मार्कस् तर फॉरेस्ट ऑफिसर पदावर काम करणाऱ्या सरकारी अधिकाऱ्याला सहा हजार डॉइश मार्कस् इतका पगार मिळतो. लग्न न

केलेल्या 'ब्रह्मचाऱ्यानां (?) टॅक्सचा तडाखा चांगलाच बसतो. या उलट बायका पोरं असलेल्या कुटुंब प्रमुखाला कमी टॅक्स भरावा लागतो. अलिकडं जर्मनीत लग्नच न करता एकत्र रहाण्याची, तसचं मुलं न होऊ देण्याची प्रथा पडली आहे. त्यामुळंच कुटुंब व्यवस्थेच्या संरक्षणाच काम सरकार टॅक्स आकारणीच्या माध्यमातून करतं. मला भेटलेली अविवाहित मुलगी पस्तीस टक्के टॅक्स भरत होती तर पन्नास वर्षांचा बायको आणि तीन मुलं असलेला गृहस्थ तिच्या दीडपट पगार असून देखील वीस टक्केच टॅक्स भरत होता. आपल्याकडेही असं चालू केल्यास आपली लोकसंख्या दोनशे कोटी व्हायला वेळ लागणार नाही.

जर्मनीत महागाई दोन टक्क्याच्या आसपास असते, तर बँकेच्या ठेवींवर सात टक्के व्याज मिळते. ही झाली जमेची बाजू. आता खर्चाचं बघू या. भाज्यांचे भाव असे- एक किलो टॉमेटो - 5.6 डॉइश मार्कस् (D.M). वांगी-3.8 D.M./kg, बटाटा-2.8 D.M./kg, कांदे-3.00 D.M./kg, लसूण-4.00 D.M./kg, गाजर पाच नगास-2 D.M./kg, तर एका कोबीच्या नगास 2.80 D.M./kg, किलोमागे फळांचे दर असे असतात-द्राक्ष-6.8 D.M./kg, केळी-4.8 D.M./kg, सफरचंद-4.8 D.M./kg, पेअर-4.8 D.M./kg, दहा नग संत्र्यास 5 D.M./kg, पायरी सारख्या एका आंब्याला 3.00 D.M./kg, तर छोट्या अननसास 5 D.M./kg.

इलेक्ट्रॉनिक्सच्या वस्तू मात्र स्वस्त असतात. शार्पचा एकोणतीस इंची टी.व्ही. 999 D.M. त्याच वेळेला भारतात त्या टी.व्ही.ची किंमत ३७,००० रुपये होती. पॅनासोनिकचा २९ इंची टी.व्ही. 1299 D.M तर फिलिप्सचा 699 D.M . भारतात हाच टी.व्ही. त्यावेळेला २८,००० रुपयाला होता सोनीचा व्ही.सी. आर. 399 D.M तर तोशिबाचा व्ही.सी.पी.279 D.M इलेक्ट्रॉनिक्समधे फिलिप्स, नॉकिया, ग्रुंडिग हे युरोपियन ब्रँड तर शार्प, अकाई, आयवा, सोनी, तोशिबा, पॅनासोनिक आणि केनवुड हे जपानी ब्रँड दिसतात. सॅमसंग, एल.जी., देवू, केनस्टार आनि कोरियन ब्रँड मात्र दिसतच नाही.

मर्सिडीजची किंमत जर्मनीत 80,000 D.M पासून चालू होते तर मारुती एस्टिम सारख्या गाड्या 24,000 D.M च्या आसपास मिळतात. झेन, सँट्रो सारख्या गाड्या 15,000 D.M ला मिळतात. तर जुन्या गाड्या 7000 D.M ते 15,000 D.M पर्यंत मिळतात. पेट्रोल लिटरला 1.8 D.M तर डिझेल 1.52 D.M ला मिळते. मध्यम वर्गीय जर्मनांच्या मते हे दर जास्त आहेत. त्यामुळ छोट्या गाड्या वापरायला त्यांनी सुरवात केली आहे. अन्यथा मर्सिडीज, बी.एम. डब्लू. , ऑडी, फोक्सवॅगन, अशा जर्मन कंपन्यांच्या मोठ्या आणि पोर्श, फरारे, जग्वार अशा वेगवान गाड्या ही त्यांची मूळ आवड. छोट्या गाड्यांमध्ये फोक्स वॅगनची पोलो आणि गोल्फ, निस्सानची मायक्रा, फोर्डची फियेस्टा, जनरल मोटर्सची कोसा, फियाटच्या पांडा आणि पुंटो तर रिनाऊल्टची सिलो ही मॉडेल्स लोकप्रिय झालीत. सध्या गाड्यांची लोकप्रियता पाहून मर्सिडिजने देखील ए-१६० ही सँट्रो सारखी छोटी गाडी बाजारात आणली आहे. वाहनांच्या बाबतीत जर्मन लोकांच्या पसंतीला जर्मनी बाहेरच्या फार थोड्या कंपन्या उतरतात. त्यातही फियाट, रिनाउल्ट अशा युरोपिन कंपन्याच अधिक. हीच गोष्ट जाणून जनरल मोटर आणि फोर्डने आपल्या गाड्यांचं उत्पादन जर्मनीतसुरु केल.

भारतीय जेवण जर्मनीत फारच अभावाने मिळते. ब्रिटीशांना जशी भारतीय मसाल्याची चटक लागली आहे, तशी जर्मन आणि फ्रेंचांना लागलेली नाही. हॅमबर्ग, म्युनिक यासारख्या मोठ्या शहरात देखील तीन चारच भारतीय रेस्टॉरंट असतात आणि बहुधा ती अफगाणी, पाकिस्तानी अथवा बांगलादेशीयांची असतात. या उलट लंडनमध्ये प्रत्येक महत्त्वाच्या भागात भारतीय रेस्टॉरंट असतातच. भारतीय रेस्टॉरंटमध्ये मिळणाऱ्या पदार्थांचे दर असे. सूप 6 D.M , सॅलाड 6 D.M , भजी 7.00 D.M, चिकन, 18.5 D.M , पुलाव 10.00 D.M , बिर्याणी 21.5 D.M, दाल तडका 14.00 D.M, आलू गोबी 14.50 D.M, पालक

---

पनीर 18.00 D.M, चना मसाला 15.00 D.M, पापड 2.00 D.M, पराठा 3.5 D.M, कुल्फी 6.5 D.M बीयर 4.00 D.M , तर पाण्याची बाटली 6.00 D.M. भारतीय रेस्टॉरंटमधे फुकट पाणी देत नाहीत. त्यामुळं बराच पैसा अक्षरशः पाण्यात जातो. जर्मन लोकांचं खाणं म्हणजे सॉसेजेस्. ब्रिटीशांचं मुख्य जेवण म्हणजे डिनर तर आपल्या प्रमाणे जर्मन लोकांचं मुख्य जेवण दुपारचं. म्हणजे पाहुण्यांना ब्रिटीश डिनरला बोलवतील तर जर्मन लंचला.

भारताविषयी जर्मनांना फारच कमी ज्ञान. ज्याप्रमाणे अमेरिकेत आपल्या ताजमहालचं आकर्षण, तसं जर्मनीत गोव्याचं जबरदस्त आकर्षण. फेणी, मासे, समुद्रकिनारा, कातडी करपवणारं ऊन. बोटींग आणि सर्फिंग या त्यांच्या आवडीच्या गोष्टी. दरवर्षी शेकडो जर्मन गोव्याला येतात आणि दोन तीन आठवडे रहातात. गोव्याप्रमाणेच दक्षिण फ्रान्सच्या 'कान' वगैरे भागांचही त्यांना आकर्षण आहे. याचं मुख्य कारण जर्मनीला फारच कमी समुद्र किनारा. फक्त उत्तरेला नॉर्थ सी आहे. पण त्यातही हॅमबर्ग, ब्रिमेन यासारखी बंदर नसल्यामुळ मोठ मोठी जहाजं येत नाहीत तर फ्रान्सनं 'कान' हा पर्यटन विभाग ठेवल्यामुळे तिथून जवळपास जहाजांना जाण्यास बंदी केली आहे. ज्याप्रमाणे वहानांच्या वर्दळीमुळे हवेतलं प्रदूषण वाढतं, त्याप्रमाणे जहाजांमुळे समुद्र प्रदूषित होतो.

अल्फ्रेड झील, दक्षिण जर्मनीत म्युनिक पासून दीडएकशे किलोमीटरवर, तर ऑसबर्ग पासून चाळीस किलोमीटरवर. स्टुटगार्ट रस्त्यावर लॅन्बिंगॉन गावात व्यवसाय करणारा आमचा कस्टमर चाळीस वर्षाचा तरुण स्वतःचा सुस्थापित व्यवसाय, बंगला, मर्सिडीज गाडी वगैरे सर्व. त्यानं लग्न केलं नाही. तो गर्लफ्रेंड बरोबर एकाच घरात गेली चार वर्षे रहातो. त्यांना मूल नाही आणि नकोय. तोच प्रकार उत्तर जर्मनीत, ब्रिमेन मधे रहाणाऱ्या हर्मन मेअर कंपनीचा मालक योखन मेअर बाबत, तोही गर्लफ्रेंडबरोबर रहातो पण त्यांनही लग्न केलेलं नाही. जर्मन तरुणपिढीत अविवाहित रहाण्याची ट्रमच निघाली आहे. लग्न संस्थेवरचा विश्वासच उडाला आहे. मुलांचं झेंगट ते पाठीमागे लावून घेऊ इच्छित नाहीत. पण अविवाहित असले तरी ते ब्रह्मचारी नाहीत. जर्मनांचं मांसाहार, दारु आणि सेक्स यावर भयंकर प्रेम आहे. टी.व्ही. वर कोणत्याही क्षणी एखाद दुसऱ्या चॅनलवर तरी विवस्त्र अवस्थेतील प्रणयाचे प्रसंग बिनधास्त दाखवत असतात. या उलट ब्रिटीश रोमँटिक, सेक्सवर उजळमाथ्याने चार चौघात चवीनं चर्चा करण्याची प्रवृत्ती कमी. सेक्स बाबत जर्मनीतला भडकपणा लपत नाही. टी.व्ही. वर कार्यक्रम सुमार दर्जाचेच असतात. जे काही चांगले कार्यक्रम असतात ते फ्रेंच अथवा इंग्रजी मधून जर्मनमधे डब केलेले असतात.

हॅमबर्ग ते म्युनिक प्रवासात आमच्या डब्यात Weigertpiroozwots या जर्मन ॲडव्हरटायझिंगमध्ये काम करणाऱ्या विशीतल्या मुला मुलींचा ग्रुप होता. ख्रिसमसआधीच्या सुटीत ते ऑस्ट्रियाला आल्पसमधे स्किईंग साठी निघाले होते. पोरांनी शॅम्पेनचा आख्खा क्रेटच आणला होता. त्यातल्या एकीचं नाव 'नीना' होतं. बावीस वर्षाची असेल. तिला जेव्हा मी सांगितलं की 'नीना' हे नाव भारतात देखील आहे तेव्हा ती खूष झाली. तिनं माझ्यासाठी शॅम्पेनचा एक ग्लास भरला. मी तो न अव्हेरता माझ्या सहकाऱ्याला दिला तिनं ते बघितलं आणि दुसरा ग्लास दिला थोडावेळ हातात धरुन तिच्या नकळत मी तोही माझ्या सहकाऱ्याला दिला. अचानक शॅम्पेनची लॉटरी लागल्या मुळ खूष झालेल्या माझ्या सहकाऱ्यांन त्याच्या बॅगेतून केळ्याचा चिवडा आणि मसाला चणे काढले मी ते पोरांना दिले त्यातला एक घास खाल्याखाल्या 'हॉट हॉट' करत किंचाळू लागली. मी एकदा धनगराच्या वस्तीवर कोंबडं खाल्लं होतं, ते खूप तिखट होतं. कोंबड्यात तिखट की तिखटांत कोंबडा घातलाय हा प्रश्न मला पडला होता. पोरांची अवस्था तशीच झाली होती. मी थोडासा चिवडा तोंडात टाकला तो चांगलाच तिखट होता.

(क्रमशः)

**अजित पाटील**
विद्या प्रसारक मंडळाची व्यवस्थापक अभ्यास संस्था, ठाणे.

•••

# बांदोडकर महाविद्यालयात झालेला योग प्रशिक्षण वर्ग

*बांदोडकर विज्ञान महाविद्यालयात झालेल्या योग प्रशिक्षण वर्गांबाबत आणि योगासनांच्या महत्त्वाबाबत माहिती देणारा हा लेख सन्मित्रच्या सहकार्याने पुर्नमुद्रित करीत आहोत. - संपादक*

श्री अंबिका योग कुटीर, ठाणे या सेवाभावी संस्थेमार्फत वा. ना. बांदोडकर विज्ञान महाविद्यालयात दिनांक ५ डिसेंबर २००० पासून योग प्रशिक्षण वर्ग सुरू करण्यात आला. या वर्गाचे उद्‌घाटन श्री अंबिका योग कुटीरचे सचिव श्री. सुर्वे व प्राचार्य सी.जी. पाटील यांच्या उपस्थितीत झाले.

या प्रशिक्षणासाठी विद्यार्थ्यांबरोबर काही प्राध्यापकांनीही प्रवेश घेतला. हा वर्ग आठवड्यातून १ दिवस प्रमाणे १२ आठवडे विनामूल्य चालला.

उद्‌घाटन प्रसंगी वर्ग सुरू करण्यात सक्रिय पुढाकार घेणाऱ्या महाविद्यालयाच्या कलामंडळाचे अध्यक्ष डॉ. र. प्र. आठल्ये यांनी अंबिका योग कुटीरच्या पदाधिकाऱ्यांचे स्वागत केले. प्राचार्य सी. जी. पाटील यांनी विद्यार्थ्यांसाठी महाविद्यालयात योगवर्ग सुरू करण्यासाठी दिलेल्या सहकार्याबद्दल विद्या प्रसारक मंडळाचे उपाध्यक्ष श्री. बि. करंदीकर, कार्याध्यक्ष अ. धों. टिल्लू व कार्यवाह उत्तम जोशी तसेच अंबिका योग कुटीरच्या पदाधिकाऱ्यांना धन्यवाद दिले व प्रशिक्षणार्थींची योगविद्येबद्दलची आस्था पाहून समाधान व्यक्त केले. अंबिका योग कुटीरचे शिक्षक व कनिष्ठ महाविद्यालयाचे उपप्राचार्य म. ह. दीक्षित व सौ. ललिता दीक्षित यांनी योगवर्ग सुरू करण्यात सिंहाचा वाटा उचलला व प्रशिक्षणार्थींना प्रशिक्षण देण्याची जबाबदारी स्वीकारली. या प्रसंगी श्री. दीक्षित व श्री. रा. तु. मिसळ यांनी प्रात्यक्षिके दाखविली.

योगवर्गांना सामान्यतः उतारवयातील व व्याधिग्रस्त लोकांची असणारी उपस्थिती बघून योगाभ्यास हा उतारवयात करण्याचा अभ्यास आहे असा सर्वसामान्यांचा समज होतो. योगविद्या ही रोगप्रतिबंधक आहे, रोगनिवारक नाही. परंतु अनुभवाने असे सिद्ध झाले आहे की किरकोळ आजारांचे व प्रारंभिक अवस्थेतील आजारांचे योगोपचाराद्वारे निवारण होऊ शकते. श्री. सुर्वे यांच्या म्हणण्याप्रमाणे योगामुळे शरीराप्रमाणेच मनाचीही मशागत होते व माणूस आजच्या धकाधकीच्या जीवनातही आत्मविश्वासाने वावरू शकतो.

आजच्या विद्यार्थ्यांना अभ्यासापासून दूर नेणारी अनेक आकर्षणे आहेत. फास्ट फूड, जंक फूड ह्यापासून मुलांना दूर ठेवणे केवळ अशक्य आहे. स्पर्धेच्या युगातले ताण-तणावाखालील आयुष्य व प्रदूषणयुक्त हवेत श्वासोच्छ्वास ह्या गोष्टीही आजच्या विद्यार्थ्याला अपरिहार्य आहेत. अशा वेळी योगाभ्यासाने सुदृढ शरीर प्राप्त करणे शक्य आहे. यामुळे मनाची एकाग्रता वाढून अभ्यासाला योग्य दिशा मिळून अभ्यास चांगल्या पद्धतीने लवकर होतो. तसेच शरीर लवचिक झाल्याने अकाली येणारा स्थूलपणा रोखला जातो, पचनशक्ती सुधारल्याने जडत्वाचा नाश होऊन उत्साह वाढीला लागतो. योगाभ्यासामुळे होणाऱ्या चांगल्या संस्कारामुळे विद्यार्थ्यांचा आत्मविश्वास व मनोबल वाढीस लागून त्यांच्यात संकटांना सामोरे जाण्याची कुवत निर्माण होते. योगाभ्यासाचे होणारे फायदे लक्षात घेऊन, कोणतीही धार्मिक बंधने न मानता जर्मनीमधील शाळांमध्ये योगाचे वर्ग सुरू आहेत. असे जेव्हा श्री. सुर्वेंनी सांगितले तेव्हां वाटले हिंदु संस्कृतीतील चांगल्या गोष्टी जेव्हा परदेशात अंगीकारल्या जातात तेव्हाच आपल्याला त्याचे महत्त्व कळते की काय ?

धौती, नेती, कपालभाती, अग्नीसार, त्राटक वगैरे योगिक क्रियांद्वारा शरीर शुद्धीकरणाचे कार्य होत असते.

स्नायुवृद्धी तसेच दमछाक करणाऱ्या व्यायामाला जर याची जोड मिळाली तर एकत्रित परिणाम नक्कीच चांगला होईल. निरनिराळ्या क्षेत्रातील खेळाडूंनी जर या क्रिया आत्मसात केल्या तर मनाची एकाग्रता वाढून स्पर्धेत नक्कीच चांगली कामगिरी करू शकतील. शरीराची लवचिकता वाढल्यामुळे खेळाडूंना होणाऱ्या दुखापतीला आळा बसेल व त्यांच्यात अकाली आढळणारे गुडघेदुखी किंवा पाठीच्या कण्याचे विकार यांनाही आळा बसेल.

मध्यमवयीन लोकांमध्ये आढळणारे उच्च रक्तदाब, अस्थमा, हृदरोग, मधुमेह, मानेचे व पाठीच्या कण्याचे विकार योगाभ्यासामुळे रोखणे शक्य आहे. नैसर्गिक उपायांनी काबूत आलेले रोग पुनः पुन्हा डोके वर काढत नाहीत. कारण त्याचे निराकरण मुळातून होत असते. उदा. मानेच्या विकारात जर वेदनाशामक गोळ्या घेतल्या तर तात्पुरता आराम मिळतो पण गोळ्या घेणे बंद केल्यावर पुन्हा आजार बळावतो व त्याबरोबरच अॅसिडीटी, बद्धकोष्ठसारखे विकारही सुरू होतात. पण योगिक क्रियांमुळे शरीरशुद्धी व आसनांमुळे स्नायुबल वाढल्यास दुखणे आटोक्यात येते व ते कायम आटोक्यात ठेवणे शक्य असते. यामुळेच असे वाटते की, योगाभ्यास सुरू करण्यास वयाचे बंधन नाही. १५ वर्षावरील कोणीही स्त्री-पुरुष योगाभ्यास सुरू करू शकतो व सदृढ शरीर, सुंदर मन प्राप्त करू शकतो.

मात्र योगाभ्यास नेहमीच शिक्षकाच्या मार्गदर्शनाखाली करणे आवश्यक आहे. 'गुरुशिवाय विद्या नाही' गुरुने शिकवले, शिष्याने मनोभावे अंगिकारले व त्यात सातत्य ठेवले तरच वरील फायदे शक्य आहेत.

अंबिका योग कुटीर या सेवाभावी संस्थेतर्फे वा. ना. बांदोडकर विज्ञान महाविद्यालयात दरवर्षी वर्षातून दोन वेळा हे वर्ग घ्यायचे योजले आहे. प्रथम सत्रात जुलै, ऑगस्ट महिन्यात व द्वितीय सत्रात डिसेंबर, जानेवारीमध्ये वर्ग भरविण्यात येतील हे वर्ग विनामूल्य असतील. आठवड्यातून एक दिवस याप्रमाणे हे वर्ग २ महिने चालतील. परिसरातील सर्व कॉलेजचे विद्यार्थी, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी तसेच ठाण्यातील रहिवासी या वर्गाचा लाभ घेऊ शकतील.

प्रथम योगवर्गाचा समारोपाचा कार्यक्रम दिनांक २० फेब्रवारी २००१ रोजी श्रीमंत थोरले बाजीराव पेशवे सभागृहात झाला. डॉ. वा. ना. बेडेकरांच्या ८५ व्या वाढदिवशी त्यांच्याच हस्ते प्रशिक्षणार्थींना प्रशस्तिपत्रकांचे वाटप करण्यात आले. या प्रसंगी प्रशिक्षणार्थींनी आपले अनुभव कथन केले आणि काही योगाची प्रात्यक्षिकेही दाखविली. शांतीपाठाने कार्यक्रमाची सांगता झाली.

**प्रा. कुंदा कारभारी**

बांदोडकर कनिष्ठ महाविद्यालय

(दै. सन्मित्र ६ मार्च २००१ वरून साभार)

•••

**वाचकांचा पत्रव्यवहार**

प्रा. मोहन पाठक यांस स.न.वि.वि.

मी तुम्हाला कालच पत्र पाठविले. तुम्ही अगदी आठवणीने, आवर्जून भारतीय शिक्षण आणि दिशा दोन्ही मासिकांत माझा लेख प्रसिद्ध करुन मला मासिक पाठविले. याबद्दल मी आपली आभारी आहे. आपल्या प्रोत्साहनामुळे मी काही अजून चांगले लिहिण्याचा निश्चितच प्रयत्न करीन.


उद्याच सगळ्या समत्रंकांना मासिक दाखवीन. भारतीय शिक्षणातील लेख सगळ्यांना दाखविला. 'दिशा' मासिक खूपच छान आहे. माझी बहीण अश्विनी खरे पण नागपूरच्या काही दैनिकांमधे अधून-मधून लिहीत असते. आम्हांला दोघींना वरील दोन मासिकांकरिता काही लिहून पाठविता येईल का ? ते जरुर कळावावे.

-मेघा खरे, नागपूर.

# नेचर क्लब अहवाल

*विज्ञान महाविद्यालयात निसर्ग मंडळाची चळवळीस जानेवारी पासून चालू झाली आहे. त्यांच्या एका निसर्गसहलीचा अहवाल देत आहोत. - संपादक*

जानेवारी २००१ मध्ये बांदोडकर विज्ञान महाविद्यालयाच्या 'नेचर क्लब'ची स्थापना झाली. या नेचर क्लबचा उद्देश हाच की, शहरात वाढणाऱ्या या मुलांना निसर्गाच्या जवळ जाता यावे, निसर्ग जास्तीत जास्त समजून घेता यावा.



या नेचर-क्लब चे पहिले-वहिले निसर्ग भ्रमण ठाणे परिसरातील ओवळा येथील फुलोरा-नर्सरीत आणि तेथील आजूबाजूचा परिसर येथे आयोजित केले होते. जानेवारीच्या २१ तारखेला ठीक ७.३० वाजता आम्ही विद्यार्थी, नव्हे, निसर्ग-प्रेमी एकत्र जमून पुढील प्रवासाला सुरुवात केली. आमच्याबरोबर मार्गदर्शक म्हणून डॉ. पेजावरमॅडम आणि पारिया सर उपस्थित होते. नर्सरीत पोहोचल्यावर तिथून जवळच असणाऱ्या डोंगर भागाचे निरिक्षण करण्यास आम्ही सुरुवात केली. त्यावेळी आम्हाला तेथेच राहणाऱ्या सुनील काकांची सोबत लाभली. वाटेत आम्हाला काटेसावरी, गुंज यासारख्या वनस्पतींची माहिती मिळाली आणि बघताही आल्या. त्याचप्रमाणे डॉ. पेजावर मॅडम यांनी आम्हाला वेगवेगळ्या पक्ष्यांची व वनस्पतींची माहिती सांगितली. त्यामुळे आमच्या ज्ञानामध्ये भर पडण्यास मदत झाली. सकाळच्या आल्हाददायक वातावरणात पक्ष्यांची किलबिल, खळखळणारे पाणी यांचे आवाज ऐकून मन प्रसन्न झाले. जवळ-जवळ दोन तास डोंगर परिसरत घालवून आम्ही सगळे नर्सरीत परतलो. नाश्ता करुन झाल्यावर आम्ही सगळे पुढील कार्यक्रमास एकत्र बसलो. डॉ. पेजावर मॅडम यांनी आम्हाला निरनिराळ्या फुलपाखरांची माहिती, त्यांची नावे व चित्रे दाखवली. त्यानंतर आजूबाजूच्या परिसरात ती बघण्यासाठी परवानगी दिली. आम्ही जवळ-जवळ अर्धा तास वेगवेगळ्या प्रकारची फुलपाखरे पाहिली. त्यानंतर प्रा. वालवलकर सरांनी घन कचरा निर्मूलनाविषयी माहिती पुरवली. ओला कचरा व सुका कचरा वेगळा करुन त्यापासून खत निर्मिती कशी करता येईल हे सांगितले. मग सगळ्यांनी एकत्र बसून वनभोजनाचा आस्वाद घेतला. मोकळ्या वातावरणात एकत्र जेवण्यात वेगळीच मजा आली. जेवल्यावर चार मुलांचा एक असे संघ करुन प्रत्येक संघाने जवळ -जवळ १०० सीताफळे आणि रिठ्याच्या बिया रोवण्याचे काम पार पाडले. थोडे शारीरिक श्रम केल्यावर खास मुलांसाठी प्रश्नमंजुषा कार्यक्रम ठेवला होता. याला उत्स्फूर्तपणे प्रतिसाद दिला.

अशा प्रकारे आम्ही निसर्गाचा आस्वाद घेत, तेथील रम्य आठवणी मनात ठेऊन त्या सुंदर परिसराचा निरोप घेतला.

• • •

# वाचनालयातील वाचक आणि वाचन

*२३ एप्रिल हा आंतरराष्ट्रीय ग्रंथ दिन आहे. त्या निमित्ताने यशवंतराव चव्हाण मुक्तविद्यापीठातून ग्रंथालय शास्त्राची पदवी प्राप्त केलेल्या माजी विद्यार्थिनीचा लेख देत आहोत. - संपादक*

आजच्या विज्ञानयुगामुळे माहिती व जनसंपर्काच्या क्षेत्रात चहुअंगांनी प्रचंड प्रगती होत आहे. आजचा समाज माहिती प्रधान आहे. कोणत्याही क्षेत्रात नवनवीन व आत्याधुनिक माहितीखेरीज प्रगतीचे एक पाऊलही पुढे पडत नाही अशी स्थिती आहे.

वाचन-कला अवगत असेल तर आपल्या ज्ञानाला आपोआप मर्यादा पडतील. ग्रंथ वाचनाव्यतिरिक्तही ज्ञानप्राप्तीची इतर साधने भरपूर आहेत. ज्ञानी पुरुषांची व्याख्याने, त्यांच्या चर्चा, संभाषणे परिसंवाद याजबरोबर आकाशवाणी, दूरदर्शन, चित्रपट किंवा आणखी अनेक दृक श्राव्य अशी साधने आज उपलब्ध आहेत पण ग्रंथ जितका सुलभ स्वस्त आहेत तितकी ही साधने नाहीत ती इकडून तिकडे नेणे सोयीची नाही. आकाशवाणी-दूरदर्शन वरील कार्यक्रम आपण ठरवीत, चालवीत नाही. आपल्यासाठी कुणीतरी ते ठरवतात. चित्रपट आणि अन्य साधने ही गैरसोयीची ठरण्याचा संभव आहे. चांगल्या ग्रंथाचे एक पान अथवा त्या पानावरील एक परिच्छेदही त्याहून भारी पडेल. ज्ञान प्राप्तीची जी असंख्य साधने आहेत त्यांतील ग्रंथ याचा क्रम पहिलाच असणार आहे.

काही व्यक्ती परीक्षेपुरंत वाचतात. वाचावयाचे पुस्तक पाठ्यपुस्तक आहे. त्यांच्या वाचनाने परीक्षा उत्तीर्ण होणे सुलभ होणार आहे, ही त्यांची दृष्टी असते. परीक्षा एकदा देऊन ते लोक आले की, त्या पुस्तकातले त्यांना काही आठवत नाही. जीवनाशी त्या पुस्तकाचे नाते उरलेले नसते. काही माणसे वेळ घालवण्यासाठी वाचन करतात. काही जण झोप येण्यासाठी वाचन करतात. काही माणसे मात्र आपलं जीवनाचं प्रतिबिंब ग्रंथात शोधतात. आपल्या जीवनातील समस्यांना ग्रंथात उत्तर सापडेल अशी त्यांना आशा असते.

वाचनाची गोडी एकाएकी लागणार नाही. वाचन एक केवळ छंद नाही. वृत्ती म्हणून ही आवड जोपासली पाहिजे. ''ग्रंथ आपले गुरू आहेत, ग्रंथ आपले मित्र आहेत.'' आपल्याला ते नेहमी सल्ला देत असतात. आनंद देत असतात. ग्रंथ थोर विचारवंतांची मने आहेत. ग्रंथात अखिल विश्वाचं भांडार आहे. आपल्या वाचनाचे अनेक हेतू असले तरी वाचलेले आपल्या लक्षात रहावे हा हेतू असतोच. आपण वाचलेले जर त्वरित विसरून गेलो असतो तर आपणाला एक-दोन पुस्तके जन्मभर पुरली असती. वाचलेल्या पुस्तकाचा जीवनात उपयोग व्हावा, पुढच्या वाचनात अभ्यासातही उपयोग व्हावा, असेही आपणास वाटते. वाचलेल्या पुस्तकातील उत्तम विचार, उत्तम स्वभाव चित्रे व इतर वाङ्मयीन लेख आपल्या लक्षात राहतात. वाचन हा केवळ नेत्रव्यापार नाही. तर वाचलेल्या शब्दांच्या मजकुरांच्या काही प्रतिमा त्यांचे काही ठसे मनाच्या कप्प्यात ठशासारखे उमटून राहतात.

वाचनाची प्रक्रिया व आपला व ग्रंथाचा संबंध अगदी व्यक्तिगत व जिव्हाळ्याचा प्रस्थापित होत असतो.उत्तम ग्रंथ हे लेखकाचे मूर्तिमंत जीवन असते. चांगले वाचन करणाऱ्याला ग्रंथालयाची मदत ही लागतेच लागते '' ग्रंथालये ज्ञानाची सदावर्ते आहेत''. परंतु ग्रंथालयामधील सर्वांगीण ज्ञानसाहित्याचा परिपूर्ण उपयोग

केला जात नाही असा अनुभव आहे. कारण जास्तीत जास्त वाचक हे ग्रंथसंग्रह किंवा ग्रंथालय सेवा यांच्याबाबत अनाभिज्ञ असतात. याकरिता वाचकांमध्ये ग्रंथालयाचा पूर्ण उपयोग करण्याचे त्यामधील ग्रंथ व प्रलेखसंग्रह वाचकाला ग्रंथालयातील ज्ञानसाधनांची माहिती असल्याशिवाय ते ग्रंथालयातील ग्रंथसंग्रह व विविध सेवा यांचा लाभ घेऊ शकणार नाही. तसचे ग्रंथालयातील ज्ञानसाधने, ग्रंथालय सेवक व ग्रंथालयातील सेवांचा उपयोग वाचकांकडून अत्यंत कमी प्रमाणात होत असल्यांचे आढळून येते. आपल्याला कोणते पुस्तक कोणत्या हेतूने वाचायला हवे याबद्दल वाचकाचे मनाशी काही ठरवले पाहिजे.

आजवर ज्ञान व माहिती देणारे प्रधान साधने पुस्तके हेच होते व त्यांचा संग्रह असणाऱ्या ग्रंथालयाचे ज्ञानभंडार म्हणून एक आगळे महत्त्व होते. आणि आजही आहेच. मात्र अलिकडे ग्रंथालयांप्रमाणेच प्रलेखकेंद्रे, संगणक इंटरनेटवर माहिती उपलब्ध होऊ शकते अशा या माहिती क्षेत्राची प्रगती व व्याप्ती वाढत चालली आहे. यावरून ज्ञान व माहितीच्या क्षेत्रातील बदलती परिमाणे आपल्या लक्षात येतात. ग्रंथालयातील वाचक आणि वाचन यांच्यात जरी ज्ञान व माहितीचीच देवघेव होत असली तरी आजच्या प्रगत माहिती प्रधान समाजामध्ये माहितीच्या गरजेप्रमाणे पुरवठा करणाऱ्या संगणक इंटरनेट सुविधा यांचे महत्व वाढलेच आहे. अर्थात अजूनही माहितीचे संकलन व वितरण करणारी पायाभूत संस्था म्हणून ग्रंथालय आणि ग्रंथ यांचे स्थान अबाधितच आहे. यात शंका नाही.

" ग्रंथ हा आपला मित्र आहे" हे खरे पण तो मुका आहे. तेथपर्यंत आपल्यालाच जायला हवं त्यातील विचार आत्मसात करायला हवेत. ग्रंथालयात असे कितीतरी संदर्भग्रंथ आहेत, कोश आहेत की, ते सतत ज्ञानात भर पाडत असतात. पण अशा संदर्भ ग्रंथाकडे सामान्य वाचकाचे सहसा लक्ष नसते. वाचकांनी ग्रंथालयातील वाचन साहित्याचा उपयोग करून आजच्या माहिती आणि तंत्रज्ञानाच्या युगात आपला पाया भक्कम करावा. माहिती देऊन मानवाला जागृत करण्याचे, परिस्थितीचे योग्य आकलन करून देण्याचे कार्य ग्रंथालये पुस्तकांद्वारे करीत असतात. अभिरूचीपूर्ण ग्रंथ वाचकांच्या हाती देऊन सुसंस्कार करतात. अशा प्रकारे माहिती, ज्ञान, मनोरंजन व संस्कार देऊन ग्रंथाच्या माध्यमातून वाचकांची जडणघडण करण्याचे मोठे सामर्थ्य ग्रंथालयांमध्ये असते. ग्रंथालय हे मूलतः त्यातील पुस्तके व इतर वाचन साहित्याच्या संग्रहामुळे एक माहितीकेंद्रच असते. त्यामुळे बुद्धीची वाढ एकांगीपणे न होता चतुरस्त्रपणा येतो. " भ्रमराने ज्याप्रमाणे उत्तम फुलाच्या शोधात असावे, मधमाशीने मधुबिंदूच्या शोधात भटकावे, त्या प्रमाणे उत्तम वाचकाने सद्ग्रंथांच्या शोधात फिरत रहावे."

**निशा जाधव**
६१, कणेरी (बौद्धवाडा),
तेलगु शाळेसमोर, भिवंडी, जिल्हा-ठाणे.

• • •

एकदा एका दुकानात एका गिऱ्हाइकाचे व दुकानातील नोकराचे भांडण चालू होते. शेवटी नोकराने गिऱ्हाइकाला हाकलवून दिले. ते पाहून दुकानाचा मालक चिडला त्याने त्या नोकराला बोलावून तास तास तासले. तो म्हणला हे बघ, ' गिऱ्हाइक हा देवा सारखा असतो. त्याचा संतोष हाच आपला आनंद. गिऱ्हाइक नेहमी खरा असतो. Customer is allways Right कळलं'. आता सांग बघू तु त्या गिऱ्हाइका वर का चिडलास. काय म्हणत होता तो ?

' तो म्हणाला की तुझा मालक गाढव आहे म्हणून.' नोकर शांतपणे म्हणाला.

# परिसर वार्ता

**विशाखा देशपांडे**

**सौ. ए.के. जोशी इंग्लिश मिडियम स्कूल -पूर्व प्राथमिक विभाग**

ठाणे येथील हितवर्धिनी सभा या संस्थेने आयोजित केलेल्या बालकवी संमेलनामध्ये कु. प्रज्ञा प्रसादे या मोठ्या शिशुच्या विद्यार्थिनीने प्रथम क्रमांक मिळवला आहे. या कवी संमेलनामधे ४९ शाळांमधून सुमारे ६० बालकवींनी भाग घेतला होता.

**सौ. ए.के. जोशी इंग्लिश मिडियम स्कूल-चित्रकला, हस्तकला व विज्ञान प्रदर्शन.**

शाळेचे हे पंचविसावं वर्ष. सालाबादप्रमाणे भरणारे प्रदर्शन म्हणजे रसिकता आणि ज्ञानाचा सुंदर मेळ. यंदा प्रथमच इ. १०वी च्या प्रयोग परीक्षांमुळे हे प्रदर्शन २० तारखेपूर्वी दिनांक १५ फेब्रुवारी २००१ ला भरवले गेले.



**१५ मार्च २००१ रोजी झालेल्या कला व हस्तकला प्रदर्शन बघताना डॉ. वा. ना. बेडेकर, अध्यक्ष वि.प्र.मं., श्री. करंदीकर.(उपाध्यक्ष)व श्री. टिल्लू, (कार्याध्यक्ष)**

डॉ. बेडेकरांच्या हस्ते चित्र-हस्त कला प्रदर्शनाचे कमळरुपी दीपाचे प्रज्वलन करुन उद्घाटन झाल्याचे जाहीर करण्यात आले. डॉ. बेडेकर, श्री. करंदीकर सर व टिल्लू सर यावेळी उपस्थित होते. पूर्वप्राथमिक, प्राथमिक व माध्यमिक अशा सर्व विभागातील विद्यार्थ्यांनी अनेक कलात्मक वस्तू केल्या होत्या.

विज्ञान प्रदर्शनात नवीन तंत्रज्ञान, सॉईल इरोजन, हेलिकॉप्टर, हायड्रोफोनिक्स, भूकंप, केमिकल गार्डन, टेलिग्राफ इ. प्रयोग होते. प्राथमिक विभागाने अश्मयुग, पाण्याचे स्रोत, विविध ऋतु, सुरक्षितता हे प्रकल्प ठेवले होते.

कै. वसंत कानेटकर आणि पु.ल. देशपांडे यांच्या प्रतिमांना हार घालून व दीप प्रज्वलन करुन पुस्तक प्रदर्शनाचे उद्घाटन करण्यात आले. वाचनालयातील विविध विषयांवरील ११००० पुस्तके, शैक्षणिक कॅसेटस् व सीडीज् मांडण्यात आल्या होत्या.

**निकाल : १ ली ते ४थी**

प्रथम पारितोषिक - अभिषेक शिंदे ४थी

द्वितीय पारितोषिक - अवृत्ती माहिमकर १ली

**५वी ते ७वी**

१) अपूर्वा भालकर - ५वी २) अंकीता धनावडे - ६वी

**८वी ते ९वी**

१) कुमुदिनी पाटील - ८वी २) प्रियांका क्षत्रिय - ९वी

**विज्ञान प्रदर्शन**

इ. ५वी-1) We can write with electricity

2) During Germination seeds use up the oxygen and release $Co^2$

इ. ६वी--Recycling of the paper

इ. ७वी -Automatic Night Lamp

इ. ८वी -Does sound need a medium to travel

इ.९वी- -Telescope

**रोशनीचे प्रकाशन**

दि. २० फेब्रुवारी २००१ रोजी डॉ. बेडेकरांच्या जन्मदिनी, मुख्याध्यापिका सौ. कालिंदी कोल्हटकर यांनी डॉ. बेडेकर यांना पुष्पपरडी दिली. डॉ. बेडेकरांनी तुम्हा सर्वांच्या शुभेच्छांमुळेच मी उभा आहे असे आपल्या अनौपचारिक भाषणात सांगितले. त्यानंतर शाळेचे वार्षिक 'रोशनी' चे फीत सोडून प्रकाशन झाल्याचे त्यांनी जाहीर केले.

**कार्यशाळा -संगणकाच्या माध्यमाने इतर विषयांचे अध्यापन**

'जिज्ञासा' या संस्थेने एका कार्यशाळेचे दिनांक १६ व १७ फेब्रुवारी २००१ रोजी तंत्रनिकेतन दृकश्राव्य सभागृहात आयोजन केले होते. सौ. ए. के. जोशी शाळेतर्फे मैत्रेयी शेवडे व प्रियंका भांगले हे दोन प्रतिनिधी पाठवण्यात आले होते. कार्यशाळेचा विषय होता **'संगणकाच्या माध्यमाने इतर विषयांचे अध्यापन'**

शिकागोतून आलेल्या John Leary (इतिहास) आणि Matthew Brown (सायन्स) यांनी मल्टिमिडियाचा इतर विषय शिकवण्यासाठी कसा उपयोग होऊ शकतो हे सांगितले.

**२० फेब्रुवारी - डॉ. वा. ना. बेडेकर यांचा वाढदिवस**

**कलावाणिज्य महाविद्यालय**

"ठाणे शहरातील शैक्षणिक इतिहासाला महत्त्वपूर्ण कलाटणी देण्याचे कार्य डॉ. वा. ना. बेडेकर यांनी केले आहे. ठाण्याच्या शैक्षणिक इतिहासात बेडेकरांचे कार्य सुवर्णाक्षरांनी लिहिले जाईल" असे भावपूर्ण उद्‌गार कला वाणिज्य महाविद्यालयाचे प्राचार्य स.वा. गोखले यांनी काढले. महाविद्यालयाने आयोजित केलेल्या 'कृतज्ञता दिन' या कार्यक्रमात ते बोलत होते. डॉ. वा. ना. बेडेकरांनी ८५ व्या वर्षात पदार्पण केले, त्या निमित्त हा कृतज्ञता सोहळा आयोजित केला होता.

या 'कृतज्ञता समारंभात' महाविद्यालयातर्फे डॉ. बेडेकरांना ८५ हजारांची थैली देण्यात आली तसेच विद्याप्रसारक मंडळाला सव्वादोन लाखाचा धनादेश प्राचार्यांच्या हस्ते देण्यात आला. सत्काराला उत्तर देताना डॉ. वा. ना. बेडेकर म्हणाले, ' या भावपूर्ण सत्कारावद्दल मी सर्वांचा ऋणी आहे. अनेक मोठ्या व्यक्तींनी वेळोवेळी केलेल्या मदतीमुळेच हे शैक्षणिक कार्य उभे राहिले. या सर्वांवद्दल मी मनापासून कृतज्ञता व्यक्त करतो."

**व्यवस्थापन शाखा - २०-२-२००१**

विद्या प्रसारक मंडळाच्या Institute of Management Studiesतर्फे डॉ. वा. ना. बेडेकर यांच्या ८५ व्या वर्षात पदार्पण निमित्त अभिष्टचिंतन सोहळा दि. २० फेब्रुवारी रोजी झाला.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालक श्री. आनंद भागवत यांनी व्यासपीठावरील उत्सवमूर्ती डॉ. वा. ना. बेडेकर, प्रमुख अतिथी श्री. दत्ताजी ताम्हणे, श्री. एस्. व्ही. वेंगुर्लेकर, श्री. करंदीकर, श्री. एच. टी. ठाणावाला व I.M.S. चे संचालक श्री. बी. एन. लाड यांचा श्रोत्यांना अल्प परिचय करून दिला.

प्रमुख अतिथी श्री. दत्ताजी ताम्हणे यांच्या हस्ते I.M.S. च्या वतीने शाल व श्रीफळ देऊन डॉक्टरांचा सत्कार करण्यात आला.



शाल व श्रीफळ देऊन डॉक्टरांचा सत्कार करतांना श्री. दत्ताजी ताम्हणे.

श्री. दत्ताजी ताम्हणे यांनी डॉक्टरांना 'शिक्षणव्रती' असे संबोधून त्यांच्या बद्दल गौरवोद्‌गार काढले. कार्यक्रमाचे आयोजक व I.M.S. चे संचालक प्रा. भा. ना. लाड यांनी आपल्या भाषणांत, 'उद्योजक व व्यवस्थापकीय अधिकारी निर्माण व्हावे यासाठी I.M.S. मधे पूर्णवेळ अभ्यासक्रम सुरु करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.' ही माहिती दिली. या साठी आवश्यक असणाऱ्या निधीसाठी सहकार्याचे आवाहन केले.

सत्काराला उत्तर देताना डॉक्टर वेडेकर म्हणाले, ' या शिक्षण क्षेत्रात जी माझी स्वप्ने साकार झाली त्या मागे एक Team Work होत आणि या नवीन स्वप्नासाठी सुद्धा आपण सर्वांनी मिळून ते साकार करू या.''

**पॉलिझिन चे प्रकाशन**

तंत्रनिकेतनाच्या 'पॉलिझिन' या वार्षिकाचे प्रकाशन प्रसिद्ध लेखक प्रकाश बाळ यांच्या हस्ते झाले. या प्रसंगी बोलताना तंत्रज्ञान आयात केले तरी त्याचे आयोजन भारतीयांच्या दृष्टीने केले जाणे गरजेचे आहे हा विचार प्रतिपादन करून स्कूटर उत्पादनाचे उदाहरण दिले.




श्री. प्रकाश बाळ पॉलिझीनचे प्रकाशन करताना.

कार्यक्रमाची सुरुवात दीप प्रज्वलनाने झाली. समारंभाचे व विद्या प्रसारक मंडळाचे अध्यक्ष डॉ. वा. ना. बेडेकर यांनी संस्थेच्या प्रगती विषयी समाधान व्यक्त केले. परंतु तंत्रनिकेतनाने लवकरच अभियांत्रिकी महाविद्यालय झाले पाहिजे अशी इच्छा प्रदर्शित केली. कार्यक्रमास प्राचार्य सी. श्री. मुजुमदार व उपप्राचार्य डी. के. नायक यांचे मार्गदर्शन लाभले होते. विद्या प्रसारक मंडळाचे उपाध्यक्ष श्री. वि. कांदीकर, कार्याध्यक्ष श्री. अ.धो. टिल्लू यांची विशेष उपस्थिती लाभली होती.

प्रा. पाध्ये यांनी केलेल्या आभार प्रदर्शनाने कार्यक्रमाचा समारोप झाला.

**'संयुजा' चे प्रकाशन**

माझ्या जडणघडणीत माझ्या महाविद्यालयाचा मोठा वाटा आहे. आठल्ये सरांच्या प्रेरणेनेच मी आंतरविद्यापीठ स्तरावर कर्तृत्व करू शकले असे भावपूर्ण उद्‌गार बांदोडकर विज्ञान महाविद्यालयाची कु. मानसी गलगली हिने काढले.

महाविद्यालय परिसरातील थोरले बाजीराव पेशवे सभागृहात 'संयुजा २००१' या वार्षिकाचे प्रकाशन कु. मानसी गलगली हिच्या हस्ते करण्यात आले. त्याप्रसंगी तिने वरील उद्‌गार काढले. प्रकाशनांतर कु. मानसीने एका गीताचे ध्रुवपद गाऊन दाखविले.

समस्यांचा ओघ संपला तर माणसाचे आयुष्यच संपले.



संयुजाचे प्रकाशन करताना कु. मानसी गलगली. डावीकडून -उपप्राचार्य डॉ. माधुरी पेजावर, प्राचार्य सी. जी. पाटील व उपप्राचार्य मकरंद दीक्षित (छाया -पिनांक रिसवूड)

कार्यक्रमाची सुरुवात महाविद्यालयातील एक जुने शिक्षकेतर कर्मचारी दिलीप सारंगधर यांनी सादर केलेल्या ज्ञानेश्वर महाराजांच्या अभंगाने झाली.

अध्यक्षीय भाषणात मार्गदर्शन करताना प्राचार्य सी. जी. पाटील यांनी अशा कार्यक्रमाचे महत्त्व सांगितले. यातूनच पुढे एखादा कलाकार, एखादी लता मंगेशकर, एखादा सचिन तेंडुलकर निर्माण होऊ शकतो. त्या दृष्टीने आपले सर्व शिक्षक-शिक्षकेतर कर्मचारी अतिशय मेहनत घेऊन विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करतात असेही ते म्हणाले.

प्रकाशन समारंभानंतर चिरंतन कला मंच या महाविद्यालयाच्या आजी-माजी विद्यार्थ्यांच्या नाट्यसंस्थेने दिलीप प्रभावळकर लिखित 'जेथे जाते तिथे' ही अतिशय वेगळ्या ढंगातील विनोदी एकांकिका सादर केली. यातील सर्व कलाकारांची कामे उत्तम झाली.

### प्रा. संतोष राणे यांना 'ग्रंथमित्र' पुरस्कार

ग्रंथ चळवळ आणि ग्रंथ प्रसार या क्षेत्रात बहुमोल कामगिरी केल्याबद्दल प्रा. संतोष राणे यांना 'सहजीवन फाउंडेशन' च्या वतीने दिला जाणारा 'ग्रंथमित्र' पुरस्कार 'महाराष्ट्र टाईम्स' चे संपादक पद्मश्री कुमार केतकर यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला.



प्रा. संतोष राणे यांना 'ग्रंथमित्र' पुरस्कार प्रदान करताना संपादक कुमार केतकर. छायाचित्रात अरुण गुजराथी, उद्योगपती अरुण फिरोदिया, डॉ. जयश्री फिरोदिया दिसत आहे.

कला वाणिज्य महाविद्यालयात मराठी विषयाचे प्राध्यापक असणाऱ्या संतोष राणे यांनी शारदा प्रकाशन' ची स्थापना करून अनेक नवोदितांना हक्काचे व्यासपीठ मिळवून दिले. तसेच अनेक मान्यवरांचेही साहित्य वाचकांपर्यंत पोहोचविण्यासाठी प्रामाणिक प्रयत्न केले. दोनशेहून अधिक पुस्तके प्रकाशित केली.

### ठाणे विधि महाविद्यालय

२५ फेब्रुवारी रोजी विलेपार्ले येथे राष्ट्रीय स्तरावर अभिरुप न्यायालय स्पर्धेचे आयोजन केले गेले होते.

या स्पर्धेत ठाणे विधि महाविद्यालयच्या श्री. दिलीप लाल आस्वानी आणि श्री. अशोक कुराला या जोडीने दुसरे पारितोषिक मिळविले. त्या प्रीत्यर्थ त्यांना एक चषक आणि रौप्यपदक देण्यात आले.



श्री. दिलीप लाल आस्वानी आणि श्री. अशोक कुराराला पारितोषिक स्वीकारताना.

## खगोलशास्त्राच्या महत्त्वपूर्ण ग्रंथांची देणगी

बांदोडकर विज्ञान महाविद्यालयास पुणे येथील खगोलप्रेमी एम. जी. नंद यांनी खगोलशास्त्र व इतर संबंधित विषयांवरील महत्त्वपूर्ण अशा ६५ पुस्तकांची देणगी दिली आहे.

स्टॉफन हॉकिंग, फ्रेड, गिबीन, आयझॅक ऑसिमॉव्ह, बर्टाड्र रसेल आदी महत्त्वपूर्ण लेखकांचे ग्रंथ या संग्रहात आहेत. या ६५ पुस्तकांची भर महत्वाची असून प्राचार्य वि. गो. नंद व त्यांचे बंधू एम. जी. नंद यांचे महाविद्यालय ऋणी आहे असे महाविद्यालयाचे प्राचार्य सी. जी. पाटील यांनी म्हटले आहे.

(टीप - या सदरासाठी मैत्रेयी शेवडे यांनी विशेष साहाय्य केले आहे.)

• • •

## एक 'उत्स्फूर्त' अभिप्राय.

मी आपल्या 'दिशा' मासिकाचा या वर्षापासूनचा नियमित वाचक व वर्गणीदार आहे. परंतु दिवाळीपासून आतापर्यंत वाचलेल्या 'दिशा' च्या अंकामध्ये मला मार्च २००१ चा अंक विशेष भावला त्याबद्दल थोडेसे....


तसे पाहिले तर कोणत्याहि पुस्तकाची सुरुवात ही त्याच्या मुखपृष्ठापासून होते. आणि मलाही या अंकाच्या मुखपृष्ठाबद्दल विशेष वाटले ते असे की, ८ मार्च हा जागतिक महिला दिन. त्या निमित्ताचे औचित्य साधून मुखपृष्ठावरील 'स्त्री' ची विविध रूपे ही एका चित्रकर्तीचा उत्कटपणे झालेला कलाविष्कार वाटतो. मंजिरी दांडेकर यांनी स्केचेसमधून 'स्त्री' च्या विविध भावमुद्रा जलरंगात अगदी मोजक्या शेडस् व स्ट्रोक्स चा वापर करून चित्रबद्ध केलेल्या आहेत. अगदी भारतीय पुरुषप्रधान संस्कृतीचा धरुन म्हणता येईल अशी 'हृदयी पान्हा...... नयनी पाणी.... स्त्री जन्मा ही तुझी कहाणी... ' इथपासून ते स्त्री शिक्षण ते स्त्रीमुक्ती-स्त्री-शक्ती इथपर्यंत त्यांनी आपल्या कुंचल्यातून स्त्री-रुपे उभी केली आहेत.

'गुरुयात्री' हा जी. ए. कुलकर्णी यांच्यावरील समीक्षात्मक लेख आवडला. एका 'रसिकाचा अभिप्राय' असा उल्लेख करता येईल तो म्हणजे डॉ. र. म. शेजवलकर यांच्या 'डॉ. आंबेडकरांच्यावरील चित्रपटाच्या निमित्ताने' या लेखाचा. तसेच राष्ट्रीय पुस्तक मेळ्याचा 'खास' उल्लेखही आवडला. एकूण लेखांच्या मानाने कवितांची संख्या अल्पस्वल्पच वाटली.

**प्रा. श्री. बिपिन धुमाळे**
सिद्धार्थ कॉलनी, ८/१५१, चेंबूर, मुंबई.

• • •

## शब्दकोडे




### आडवे शब्द

१) x x x x ज्ञानमयः प्रदीपः विद्या प्रसारक मंडळाचे बोधवाक्य.
३) x x x महाडिक नासाच्या मंगळावरील स्वारीसाठी निवड झालेला मराठी विद्यार्थी.
४) एक रागाचा, गायनाचा प्रकार.
५) x x x आझमी एक बुद्धीजीवी अभिनेत्री.
८) x x सर्व सुखी असा कोण आहे
९) विकट वाट x x x x
११) महावीरांचा धर्म.
१३) कोल्हापूर
१५) x x ग कशी तू बापाची मावशी
१७) एक महाभंयकर जगाचा विध्वंस करणारी शक्ती.

### उभे शब्द

१) ग्रह ताऱ्यांचे अंतर 'याच्या' गतीने मोजतात.
२) आनंद समाधान
३) भूकंपाच्या धक्क्याने सर्वाधिक नूकसान या जिल्ह्याचे झाले.
६) अतिशय शुद्ध स्वरूपाचे
७) x x कशी म्हणू तुला म्हणते रे गीत
८) x x x x बोस, शास्त्रज्ञ
१०) लाकूड पोखरणारा कीटक.
१२) दिवा
१४) रस किंवा आस्वाद घेणारा प्रेक्षक
१५) x x तेरो नाम ईश्वर तेरो नाम

अजित अ. कुलकर्णी

## प्रश्न आणि उत्तरांचा खेळ

१) महाविद्यालये व विद्यापीठाचा दर्जा पुढील पैकी कोणती कौन्सील करते ?
1) NCERT 2) NAAC 3) NCTC 4) UGC

२) खालील पैकी कोणता दिवस रंगभूमी दिन म्हणून साजरा केला जातो.
१) १ जानेवारी २) ११ आक्टोबर
३) २७ डिसेंबर ४) ५ नोव्हेंबर

३) मराठी भाषेच्या व्याकरणातले पाणिनी म्हणून कोणाचे नाव घेतले जाते.
१) वि. ल. भावे २) बळवंत पांडुरंग
३) दादोबा पांडुरंग ४) न. चि. केळकर

४) महर्षी धोंडो केशव कर्वे यांनी पुढील पैकी कोणती शिक्षण संस्था स्थापन केली.
१) श्रद्धानंद छात्रालय २) डेक्कन सोसायटी
३) भारत सेवक समाज ४) हिंगणे स्त्री शिक्षण संस्था

५) डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी बौद्ध धर्माची दीक्षा कोणत्या शहरात घेतली.
१) नागपूर २) अकोला ३) महाड ४)पुणे

६) भारतीय घटनेचे कलम ७४ व ७५ कशाशी संबंधित आहे ?
१) कॅबिनेट मंत्री २) मंत्री परिषद
३) लोकसभा स्पीकर ४) राष्ट्रपती

७) खालील पैके कोणती नेमणूक राष्ट्रपतींच्या द्वारे होत नाही.
१) मुख्य निवडणूक अधिकारी २) सर्वोच्च न्यायालयाचे न्यायाधीश ३) राज्यपाल ४) उपराष्ट्रपती

८) पुढील पैकी कोणत्या भारतीय शहरात भुयारी रेल्वे मार्ग आहे.
१) कलकत्ता २) नागपूर ३) चंदीगड ४) वाराणसी

९) 'सनी' हे टोपण नाव लावून ओळखला जाणारा भारतीय क्रिकेट पटू कोण ?
१) संदीप पाटील२) सौरभ गांगुली ३) सुनील गावस्कर
४) यापैकी एकही नाही

१०) तुळजापूरचे भवानी मातेचे मंदिर कोणत्या जिल्ह्यात आहे ?
१) औरंगाबाद २) उस्मानाबाद ३) नाशिक ४) सातारा

(उत्तरे पुढील अंकी)

प्रत्येक व्यक्ती ही चंद्रासारखी असते. आपली 'काळी बाजू' ती जगापासून नेहमी लपवून ठेवते.